मूल्य १० रुपये

न मातुः पर दैवतम् ।

। जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।

# मातृसेवा



## एक यावा असा दिन
## ना राहो महिला 'दीन'
## रोज असावा 'महिला दिन'

### जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

वर्ष ५८ वे　　२४ मार्च २०२४　　अंक ३



# मातृसेवा

कै. कमलाताई होस्पेट : संघसंस्थापिका
कै. प्रमिला दाणी : आद्य संपादिका


**स्थायी समिती (२०२१-२०२८)**

- डॉ. अरुणा बाभुळकर : अध्यक्ष
- डॉ. लता देशमुख : सचिव
- श्रीमती शीला राव : संपादिका
- श्रीमती ममता चिंचवडकर
- श्रीमती सुरेखा देवघरे
- सौ. यश:श्री वाघ
- श्रीमती शोभा पारळकर
- श्रीमती वनिता पाटील : आमंत्रक


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | – शीला राव | ३ |
| स्मिता सिंगलकर | – | ४ |
| माधुरी कानेटकर | – प्राची माहुरकर | ५ |
| डॉ. मीना शेलगावकर | – | ७ |
| लेखिका माझी सासू–आशा बगे | – दीप्ती राजेश बगे | ११ |
| प्राची माहुरकर – एक ऊर्जावान व्यक्तिमत्व | – माधुरी कानेटकर | १३ |
| अनुराधा मोहनी | – विनीता हिंगे | १६ |
| डॉ. प्रज्ञा आपटे : अष्टपैलू व्यक्तिमत्व | – विनीता हिंगे | १९ |
| सुप्रिया अय्यर : बहुआयामी व्यक्तिमत्व | – विनीता हिंगे | २० |
| Dr. Kirty Arun Sirothia | | २२ |
| सौ. साधना जोशी | – | २३ |
| चैताली भस्मे – सर्पमित्र | – | २५ |
| सौ. तृप्ती प्रशांत नेरकर | – रागिणी बक्षी | २८ |
| प्रीती दामले | – शोभा पारळकर | २९ |
| **शाखावृत्त** | | |
| मातृसेवा संघ आर्वी शाखेत आरोग्यविषयक जनजागृती | | ३० |
| स्नेहांगण मध्ये डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन | | ३० |


**कृपया नोंद घ्यावी, वार्षिक वर्गणी रु. २०० आहे लवकरात लवकर वर्गणी पाठवावी.**


कार्यालय : मातृसेवा संघ, सीताबर्डी, नागपूर – १० फोन : २५२२३९३, २५२२२८७, २५२३५९([illegible])
Website : http:/www.mss.org.in Email : matrusewa@yahoo.com


**अंक मिळत नसल्यास जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये तक्रार करावी.**

# संपादकीय

– शीला राव

**सामर्थ्यशील धृतियुक्त तथा गुणीही ।**
**स्पृहास्पदहि वन्द्य महिला असती कितीही ।।**

ह्या माझ्या उक्तीचा प्रत्यय आपणां सर्वांना ह्या आपल्या मार्चच्या महिलांना समर्पित अंकात नक्कीच येईल. मार्चच्या आठ तारखेला 'जागतिक महिला दिन' असतो हे सगळ्यांना माहितच आहे. त्यानिमित्ताने नागपुरातील काही कर्तबगार महिलांचा परिचय थोडक्यात देण्याचा प्रयास केलेला आहे. किती वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या स्त्रिया महत्त्वाचे काम करीत आहेत समर्थपणे ! खरंच मला तरी कल्पना नव्हती. अशा विविध क्षेत्रातील काही जणींचा शोध घेऊन, त्यांच्याशी संपर्क साधून मातृसेवा मासिकाच्या या अंकात त्यांचा अल्पपरिचय देण्याचा आमचा प्रयत्न तुम्हाला नक्कीच आवडेल.

ह्यांत लेखिका, वकील, औषधांची निर्मिती करून पेटंटही मिळवणाऱ्या, सर्पमित्र, रुचकर पदार्थांनी लोकांना संतुष्ट करणाऱ्या, तसेच आध्यात्मिक क्षेत्रात काम करणाऱ्या, समाजहित साधणाऱ्या इत्यादींचा समावेश आम्ही केला आहे. ह्या सगळ्यासाठी माझ्या सहकाऱ्यांनी मला खूप मदत केली आहे, त्यांचे मनःपूर्वक आभार आणि धन्यवाद !

पूर्वी स्त्रियांना अनेक मर्यादा घालून दिलेल्या होत्या. चूल-मूल हाच त्यांचा व्यवसाय (?) होता, पण काळाबरोबर आपण बरीच प्रगती केलेली आहे. त्यासाठी खरंच आपण आपल्या समाजातील सुधारकांना अनेक धन्यवाद दिले पाहिजेत मनापासून ! आता असं एकही क्षेत्र नाही, ज्यात महिलांनी प्रवेश करून प्राविण्य मिळवलेलं नाही. अंतराळवीरांपासून तर क्रीडाक्षेत्र, शिक्षणक्षेत्र, राजकीयक्षेत्र, चिकित्साक्षेत्रातही सगळीकडे महिला मुक्तपणे संचार करताना दिसतात. असेच उत्तरोत्तर होऊ दे ईश्वरा!

**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः ।**

---

## स्मिता सिंगलकर

ह्या बीए.एलएलबी., एलएलएम् असून त्यांनी एमबीए ही केलेले आहे.

१) २००७ पासून उच्च न्यायालय नागपूर येथे प्रॅक्टिस करत आहेत.

२) त्यांनी महिला अधिकारांसाठी सुरुवातीपासूनच विशेष कार्य केले आहे. जसे की -

❊ त्यांनी २००७ साली बलात्कारपीडित आणि लैंगिक छळाला बळी पडलेल्या महिलांसाठी मोफत कायदेविषयक सल्ला आणि खटला चालवण्यासाठी त्यांच्या लाड अपार्टमेंट, धरमपेठ, नागपूर येथील कार्यालयात रेप क्रायसिस सेंटर सुरू केले. याद्वारे अनेक पीडितांना त्यांनी मदत केली आहे.

❊ Occupy the Men's Toilet या आंदोलनातून त्यांनी महिला स्वच्छतागृहांच्या महत्त्वाच्या प्रश्नाला वाचा फोडली.

❊ वॉक फॉर रिस्पेक्ट या रॅलीद्वारे त्यांनी हॅश टॅग मी टू  या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या आंदोलनाला नागपूरमधून पाठिंबा नोंदवला.

❊ मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे आठवड्यातून दोन वेळा स्वत: जाऊन जावून गरीब बंदीवान कैदी आणि महिलांची केस न्यायालयात मोफत लढतात.

❊ नागपूर मधील अत्यंत वर्दळीच्या शंकरनगर चौक येथे  रात्री बारानंतर येऊन सर्व महिला मुलींनी चहा प्यायला यावे असे आवाहन त्यांनी Night Tea With-zadi या कार्यक्रमाद्वारे केले. आणि शेकडो महिला त्यात सहभागी झाल्या. महिलांच्या सुरक्षेचा महत्त्वाचा मुद्दा त्यांनी याद्वारे समोर आणला.

३) सध्या त्या लैंगिक अत्याचारापासून महिलांचे संरक्षणासाठी असलेल्या नागपूर जिल्ह्याच्या स्थानिक तक्रार निवारण समिती च्या अध्यक्ष आहेत. आणि या पदावरून त्या अनेक महिलांना न्याय देण्याचे कार्य अविरतपणे पार पाडत आहेत.

४) अनेक प्रतिष्ठित शासकीय आणि अशासकीय कार्यालय जसे की विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर जिल्हा परिषद, नागपूर महानगर पालिका,  मॉरिस कॉलेज अशा अनेक महाविद्याय, हॉस्पिटल्स आणि कॉरपोरेट कंपन्यांच्या अंतर्गत समितीवर त्यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे.

५) भंडारा जिल्ह्यातील मुर्माडी येथील तीन सख्या बहिणींच्या मृत्यूमागील कारणे शोधण्यासाठी आणि मृत्यूची चौकशी करण्यासाठी त्यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या Fact Finding Committee वर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

६) गंगा जमुना या वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या वस्तीमधील महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन आणि सल्ला देण्याचे कार्य त्या सातत्याने करीत आहेत.

८) Asia' s Young Leader म्हणून त्यांना मलेशिया क्वालालंपूर येथे २००९ साली बोलवण्यात आले होते आणि त्यांचा गौरव करण्यात आला.

९) त्या सातत्याने विविध वर्तमान पत्रामध्ये महिलाविषयक लेख लिहीत आहेत. त्यांचे न्यायनिवारा हे पुस्तक २०१९ साली प्रकाशित झालं असून त्याला प्रचंड मागणी आहे. तसेच आकाशवाणी आणि  विविध चॅनल्स वर त्या महीलाविषयक आणि कायदेविषयक चर्चासत्रामधे सहभागी असतात.

७) त्यांच्या या सगळ्या कार्याची दखल घेऊन दि. १५.८.२०२३ ड. स्मिता सरोदे सिंगलकर यांना राज्यशासनाचा अतिशय महत्त्वाचा २०१९-२० या वर्षीचा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते देण्यात आला. त्यांच्या भविष्यासाठी अनेक शुभेच्छा!

---

## माधुरी कानेटकर

**- प्राची माहूरकर**

माधुरी कानेटकर या पेशाने व शिक्षणाने फॅशन डिझायनर आहेत. मुंबईच्या सुप्रसिद्ध SNDT महाविद्यालयातून फॅशन designing मध्ये पदव्युत्तर शिक्षण घेऊन त्यांनी नागपुरात आपल्या व्यवसायाचा जम बसवला होता. त्यांचा व्यवसाय त्यांच्या ग्राहकांमध्ये प्रसिद्ध तर होताच परंतु त्यांचे ग्राहक वर्षानुवर्षे त्यांच्याशी जुळलेले देखील होते. जो विषय हाती घेतला त्यात पूर्णपणे जीव ओतायचा हा त्यांचा स्वभाव आहे. मग ते वाचन असो की गाणी ऐकणे असो. वाचन देखील इतके अफाट की कित्येक पुस्तकांचे संदर्भ त्या सहजगत्या देतात. आशा भोसलेंनी गायलेल्या गझल त्याच्या अर्थासकट त्यांना तोंडपाठ आहेत. त्या स्वतः उत्तम लिहितात.  तसेच संपादनाचे काम देखील करतात. आजचा सुधारक या  त्रैमासिकासाठी त्या संपादनाचे काम करतात. मध्यंतरी जल थल मल या सुप्रसिद्ध पुस्तकाचा मराठी अनुवाद करण्यात त्यांचा मोठा हातभार राहिलेला आहे. त्या उत्तम कविता देखील करतात. अधूनमधून त्यांच्या कविता फेसबुकवर वाचायला मिळतात. आमच्या वाचनातून विवेकवादाकडे या वादावादीच्या वर्गात वाद न घालणाऱ्या त्या एक अशी पण त्यांची ओळख सांगायला हवी.

माधुरीताई मात्र जेव्हा मला पहिल्यांदा भेटल्या तेव्हा झाडांविषयी माहिती घेण्यास उत्सुक असणारी व्यक्ती अशा स्वरूपात भेटल्या. मी झाडांची नावे घेऊ लागले की सगळ्यात जास्त इंटरेस्ट माधुरीताई दाखवायच्या. साधारण ९ वर्षांपूर्वी याच दिवसात सकाळी अंबाझरी तलावाजवळची झाडे दाखवायला येतेस का असे ताईंनी मला विचारले. मी लगेच तयार झाले व आम्ही दोघीनी दुसऱ्या दिवशीची सकाळ अंबाझरी तलावाच्या काठावरची, धरमपेठ कॉलेज जवळची झाडे पाहण्यात

घालवली. ताईंची निरीक्षणशक्ती जबरदस्त असल्यामुळे एकदा दाखवलेले झाड आणि सांगितलेले नाव (फक्त झाडाचे) त्यांच्या पक्के डोक्यात बसते. त्यामुळे नवीन कुठले नाव कळले की लगेच दाखव मला ते झाड असे त्या म्हणणार आणि आम्ही ते झाड बघायला जाणार हे ठरून गेले होते. मध्यंतरी त्यांनी इकोलॉजिकल सोसायटीचा वर्षभराचा कोर्स केला. त्यासाठी त्यांच्या व्यवसायातून त्यांनी व्यवस्थित वेळ काढला. सगळ्या फील्ड visits न चुकता केल्या. या सगळ्यातून त्यांना त्यांचा जिवाभावाचा विषय कळला तो म्हणजे झाडे. आता झाडांची ओळख या विषयात त्या इतक्या पुढे गेल्या आहेत की नागपुरातील सगळ्या चांगल्या टेक्सानॉमिस्टस यांच्या रांगेत माधुरी कानेटकर यांना बसवता येईल आणि या विषयात त्या कुठेही कमी पडणार नाहीत. मध्यंतरी माझ्या शेतातील झाडांची विविधता मोजायला त्यांना यावे लागले. एखाद्या झाडाचे नाव घेतले की त्या झाडाची फॅमिली कुठली, त्याचे characteristics काय, कुठल्या वातावरणात, कुठल्या प्रदेशात ते झाड दिसू शकते हे देखील आता त्या सांगू शकतात. आणि गम्मत म्हणजे प्रत्येक झाड मग ते अगदी तण का असेना किती इंटरेस्टिंग आहे याविषयी सांगताना त्या थकत नाहीत. मध्यंतरी आम्ही नागपूर महानगरपालिकेसाठी काही मर्यादित जागेचे वृक्षगणनेचे काम केले होते. तेव्हा या कामात माधुरीताईंचा सहभाग सगळ्यात महत्त्वाचा होता. त्या नसत्या तर कदाचित हे काम होऊ देखील शकले नसते. ज्या निगुतीने, नेटाने आणि काटेकोरपणे वृक्ष गणना झाली आणि जितके झाडांचे वैविध्य या कामात नोंदवल्या गेले ते फक्त ताईंमुळे होऊ शकले हे नक्की. हे करायला कामाप्रती असणारी निष्ठा आणि प्रेम दोन्ही असले तरीही जो वेडेपणा लागतो तो ताईंमध्ये पुरेपूर आहे. झाडे कशी ओळखायची व कशी लक्षात ठेवायची हे ज्याला नव्याने शिकायचे असेल त्यांनी माधुरी ताईंकडे यावे. आम्ही मिळून बीजसंकलन देखील करतो. त्यासाठी वाट्टेल तिथे फिरायची त्यांची तयारी असते. हे बीजसंकलन नंतर बीजोत्सवात जेव्हा आम्ही प्रदर्शित करतो तेव्हा त्याची पूर्ण जबाबदारी माधुरी ताई घेतात. तिथे पूर्ण वेळ हजर राहून भेट देणाऱ्यांना माहिती देणे, बियाण्यांची देवाणघेवाण करणे, त्याच्या नोंदी ठेवणे ही सगळी कामे त्या अतिशय मनापासून करतात. बीजसंकलन करताना कुठल्या मौसमात कोणत्या झाडाच्या बिया मिळतील याची माहिती आम्हाला दर वेळी शोधावी लागायची. मग त्याचा एक चार्ट त्यांनी तयार केला. तो सगळ्यांना उपलब्ध देखील करून दिला. बिया उगवण्यासाठी काय उपाय करावे याचा दस्तावेज तूर्तास करणे सुरू आहे. त्यासाठीच्या संशोधनाची मोठी जबाबदारी अर्थातच माधुरीताईंनी घेतली आहे. नैसर्गिक संसाधने जपणे असो की नैसर्गिक व्यवस्था टिकवण्यासाठीची कामे, सगळीकडे आधी विषय झाडांचा येतो. आणि त्यात माधुरीताई पूर्ण मार्गदर्शन करतात. निसर्गपुरक जीवनशैलीचा भाग म्हणून त्या घरच्याघरी फळांच्या सालींपासून

bio enzymes बनवतात. आपल्या आवडत्या विषयाला पूर्ण न्याय द्यायला त्या संगणक देखील शिकल्या. आता लॅपटॉप घेऊन ऑफिसला येऊन त्या संशोधन आणि दस्तावेजीकरण लीलया करत असतात. त्यांचे हे वेड अधिकाधिक वाढीला लागो व झाडांचे हिरवे आशीर्वाद त्यांना पुढची अनेक वर्षे लाभोत हीच निसर्गचरणी प्रार्थना.

---

## डॉ. मीना शेलगावकर (औषधी तज्ञ)

मीना श्रीनिवास शेलगावकर ह्या पूर्वाश्रमीच्या मीना माधव पडळकर. जन्म कोल्हापुरातला. वडील हे गांधी विनोबांच्या विचारांनी भारलेले. त्यांनी १९४२ च्या चले जाव आंदोलनामध्ये कॉलेज शिक्षण अर्धवट सोडून स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. पुढे विनोबाजींच्या भुदान आंदोलनात सामील झाले.

घरात विविध विषयांवरील चर्चा, गाणी, नाटके व भरपूर खाणे पिणे अशी मेजवानी असे. लहान वयामध्ये सर्व काही समजत नसले तरी बालपण थोरामोठ्यांच्या गोष्टी ऐकण्यात, कसल्याही दडपणाशिवाय, अत्यंत आनंदात गेले. बहुधा मुलांना वेळेवर जेऊ घातले की झाले अशी संगोपनाची धारणा असावी.

अकरावी मॅट्रिक १९७४ मधे फर्स्ट क्लास डिस्टिंक्शन मध्ये उत्तीर्ण झाले. मॅट्रिकला विज्ञान व मराठी भाषेमध्ये बक्षिसेही मिळाली. आंतर शालेय सर्व प्रकारचे खेळ, आंतर शालेय विज्ञान प्रदर्शनी, वक्तृत्व स्पर्धा, नाट्य स्पर्धा इत्यादी सर्व प्रकारांमध्ये यशस्वी सहभाग असे.

पदवी परीक्षेत डिस्टिंक्शन असल्यामुळे खेळाच्या प्रशिक्षकांनी औरंगाबाद येथील मेडिकल कॉलेजमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी समुपदेशन केले. डिस्टिंक्शन असल्यामुळे औषधी शास्त्रामध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी सहज प्रवेश मिळाला. हा आयुष्यातील एक मोठा योगायोग होता.

हा कोर्स करत असताना मुख्यतः प्राण्यांवर औषधांचे काय परिणाम होतात हे शिकायला मिळते. तसेच एखादा पदार्थ औषध आहे हे सिद्ध करण्याचे संशोधन कसे करावे याचे प्रशिक्षण मिळते. ह्या काळामध्ये डॉक्टर सदरे, डॉक्टर विभावरी देशपांडे, डॉक्टर नंदाल, यांच्यासारखे मान्यवर शिक्षक लाभले. त्याकाळी औरंगाबादचे फार्मेकॉलॉजी डिपार्टमेंट औषधी संशोधनामध्ये अग्रगण्य होते. एमएससीच्या प्रबंधामध्ये नविन अँटिसायकोटिक औषधांमध्ये काम करण्याची संधी मिळाली व संशोधन सुरू असतानाच राज्यस्तरीय कॉन्फरन्स मध्ये त्याविषयीचे पेपर वाचण्याची ही संधी मिळाली.

डिपार्टमेंट मध्ये प्राध्यापक म्हणून नवीन रुजू झालेल्या डॉक्टर श्रीनिवास

शेलगावकर यांच्याशी पुढे लग्न झाले व त्यांचे मूळ गाव नागपूर असल्याने लग्नानंतर नागपूरला स्थायिक झाल्या.

लग्न झाल्यानंतर दत्ता मेघे यांच्या नगर युवक शिक्षण संस्थेमध्ये डी एम एल टी च्या कोर्स साठी प्राध्यापक म्हणून तासिका तत्त्वावर नोकरी मिळाली. सुरुवातीची दोन वर्षे डीएमएलटी विद्यार्थ्यांना नॅटॉमी, फिजिओलॉजी बायोकेमिस्ट्री, व इतर सर्व विषय नवीन प्राध्यापक नेमणूक होऊन येईपर्यंत शिकवण्यात गेली. त्यानंतर संस्थेने डिप्लोमा फार्मसी येथे नाटोमी फिजिओलॉजी व फार्मकॉलॉजी शिकवण्यासाठी बदली केली. हा डिप्लोमा कोर्स असला तरी सरकारी ग्रँड असल्यामुळे व पेन्शनबल सर्विस असल्यामुळे पुढे २५ वर्षे नोकरी केली. त्या काळात दोन मुले झाली.

परंतु मूळची संशोधनाची आवड गप्प बसू देत नव्हती त्यामुळे मुले थोडी मोठी झाल्यावर मेडिकल कॉलेज नागपूर येथे पीएचडी साठी काम करायला सुरुवात केली. त्यावेळेस फॉरमॉकॉलॉजी मध्ये मेडिकल कॉलेजच्या डिपार्टमेंट मध्ये पीएचडी साठी सोय नव्हती म्हणून डिपार्टमेंट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस मध्ये पीएचडीसाठी नोंदणी केली व कामाचे ठिकाण निवडले मेडिकल कॉलेजचे चेस्ट अँड मेडिसिन डिपार्टमेंट. येथे क्षयरोग व अस्थमा मध्ये काम सुरू केले.

फुफ्फुसांच्या क्षय रोगामध्ये एकूणच औषधांची संख्या कमी आहे. क्षयरोगी जरी बरा झाला तरीसुद्धा त्याच्या फुफुसामध्ये ज्या भागांमध्ये इन्फेक्शन झालेले असते तेथे फायब्रोसिस होऊन तो भाग श्वसनाचे सामान्य काम करू शकत नाही व रुग्णास छातीमध्ये वेदनाही होत असतात. या प्रश्नावर काम करण्यास सुरुवात केली. त्यावेळेस असे लक्षात आले की क्षय रोगांच्या रुग्णांमध्ये फ्री रेडिकलचे प्रमाण हे नॉर्मल पेक्षा खूप जास्त असते व जरी क्षयरोग बरा झाला तरी हे फ्री रॅडिकलचे प्रमाण वाढत जाते. हे फ्री रेडीकल्स आपल्या शरीरातील पेशीमध्ये तयार होतात व ते एखाद्या शस्त्रासारखे जंतू मारण्यासाठी काम करतात. परंतु क्षयरोगाच्या जंतूंमध्ये ह्या फ्री रेडीकलचा अवरोध करण्याची ताकत असते. त्यामुळे क्षयरोगाच्या जंतूंवरती या फ्री रेडिकलचा काहीच परिणाम होत नाही. उलटपक्षी हे फ्री रॅडिकल्स निर्माण करणाऱ्या फुफ्फुसातील मायक्रोफेजेसलाच (ज्या पेशीमध्ये क्षयरोगांचे जंतू असतात) डॅमेज करतात व त्यातून टीबीचे जंतू इतरत्र पसरतात. अशा पेशंटच्या थुंकी मधून टीबीचा संसर्ग होतो. एवढेच नाही तर फुफुसातील पेशीनाही हे फ्री रॅडिकल्स क्षती पोहोचवतात. ह्या प्रश्नावर काम सुरू केले. नवीन टीबीच्या रुग्णांना त्यांच्या रेगुलर ट्रीटमेंट सोबत विटामिन ई व विटामिन सी हे दोन अँटिऑक्सिडन्स औषधे म्हणून देण्यास सुरुवात केली. विटामिन-ईचा हा परिणाम रिफांपीसीन ह्या अँटीटीबी औषधासारखा दिसून आला. या संशोधनासाठी मीना शेलगावकर यांना केवळ पीएचडी मिळाली नाही तर टीबीच्या नवीन ट्रीटमेंटचे २० वर्षाचे प्रॉडक्ट पेटंटही मिळाले.

मीना शेलगावकर यांचा संपर्क हळूहळू नागपुरातील इतर सामाजिक कार्य करणाऱ्या मान्यवर स्त्रियांशी पण येत होता. २००० साली त्यांना त्यांच्या तीन मैत्रिणींसोबत जिनिव्हा येथे युएन सोशल फोरम २००० मध्ये भाग घेण्याची संधी मिळाली. तेथे त्यांचा संपर्क वर्ल्ड इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी राईट्स या संस्थेशी आला. त्यानंतर त्यांनी २००१ व २००२ अशी दोन वर्षे इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी राइट्स चे ऑनलाइन कोर्सेस केले ह्या शिक्षणाचा उपयोग त्यांना क्षयरोगावरचे पेटंट मिळवताना झाला हे पेटंट त्यांनी स्वतःच फाईल केले.

या सुमारास अंतरराष्ट्रीय पेटंट कायद्यामध्ये बरेच बदल होत होते २००५ पासून सर्व जगामध्ये पेटंट चे नियम सारखे होणार होते. पूर्वी भारतामध्ये सात वर्ष अवधीचे फक्त प्रोसेस पेटंट मिळत असे. त्याचा फायदा आपल्या देशाला विशेषतः औषधी निर्माण शास्त्राला व कंपन्यांना खूप मोठ्या प्रमाणात झाला. प्रोसेस पेटंट याचा अर्थ एका विशिष्ट पद्धतीने जो प्रॉडक्ट तयार होईल त्या पद्धतीचे फक्त एकस्व अधिकार म्हणजे मालकी हक्क म्हणजेच पेटंट मिळत असे. तयार झालेल्या प्रॉडक्ट वरती पेटंट मिळत नसे. याचा फायदा घेऊन भारतातील औषध कंपन्या वेगळ्या पद्धतीची प्रोसेस वापरून आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी तयार केलेली औषधे आपल्या देशात निर्माण करत असत. त्यामुळे भारतामध्ये औषध कमी किमतीत उपलब्ध होत असत.

इंटलेक्चुअल प्रॉपर्टी राइट्सचा अभ्यास करत असताना त्यांच्या अजून एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे इंटेलेक्च्युअल राइट्स पैकी एक प्रकार सामाजिक मालकी असलेला आहे. तो म्हणजे जिओग्राफीकल इंडिकेशन (जी आय.) एखादी कलाकृती, वस्तू जर पारंपारिक पद्धतीने एखादा समाज तयार करत असेल व ती त्या समाजाची ओळख असेल उदाहरणार्थ चंदेरी साड्या, कोल्हापुरी चप्पल किंवा एखाद्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमध्ये एखादं पिक येत असेल उदाहरणार्थ नागपूरची संत्री, भिवापूरची मिरची इ. आंतरराष्ट्रीय स्थरावर या गोष्टींसाठी त्या संपूर्ण समुदायाला अशा गोष्टीचा मिळालेला मालकी हक्क म्हणजेच जिओग्राफीकल इंडिकेशन. या सामुदायिक हक्काच्या जागृतीसाठी व एकूणच इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी राईट साठी मीनाने कॉलेजेस मध्ये, विविध संस्थांमध्ये लेक्चर घेणे सुरू केले.

२००० सालची जिनेवा ट्रिप अनेक दृष्टीने आयुष्यात बदल घडवणारी ठरली. जिनीवातील विमेन इंटरनॅशनल लीग फोर पीस अँड फ्रीडम ह्या युनायटेड नेशन्सला ऑब्झर्वेशन चे स्टेटस असलेल्या संस्थेशी संबंध आला. या संस्थेची भारतातील शाखा सुरू करण्यात सहभाग घेण्याची संधी मिळाली. त्यानिमित्ताने नागपुरातील विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्री संघटनांशी संबंध आला. नवीन ओळखी झाल्या. त्यातलीच एक महत्त्वाची ओळख म्हणजे जयश्रीताई

पेंढारकर आहार तज्ञ यांची. त्यांचा पदर धरून मीना मेळघाटात कुपोषणावर काम करणाऱ्या संस्थांची मदत करायला लागली. त्यांच्यामुळेच कमलाबाई हॉस्पेट स्त्री सहाय्यक मंडळ या संस्थेमध्ये त्या सहभागी झाल्या. आजही मीना हा संस्थेमध्ये कार्यरत आहेत.

ह्यास सुमारास डॉक्टर सतीश गोगुलवार व शुभदा देशमुख ह्या आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्थेच्या संस्थापक सदस्यांची नव्याने ओळख झाली. ही संस्था गेली ४० वर्षे गडचिरोली भागात आदिवासींच्या विविध प्रश्नांवर विचारपूर्वक काम करते आहे. त्यामध्ये आरोग्य हा एक महत्त्वाचा विषय आहे. या संस्थेमध्ये आरोग्याच्या संदर्भात व औषधांविषयी विविध संशोधन पर प्रक्रियेमध्ये काम करण्याची संधी मिळाली. आम्ही आमच्या आरोग्यासाठी या संस्थेने त्यांना संस्थेमध्ये ट्रस्टी व एक्झिक्यूटिव्ह कमिटी मध्ये घेतले आहे. आज या संस्थेच्या माध्यमातून यवतमाळ भागातील बंजारा समाजा किडनी विकारग्रस्त रुग्णांमध्ये एक संशोधन सुरू आहे.

लोकांना उपयोगी पडतील अशा विषयांवर, उपलब्ध असलेल्या साधनसामग्री मधून संशोधन करण्याकडे त्यांचा जास्त कल आहे. सतत पाण्यात राहिल्याने पायाला होणाऱ्या चिखल्यांसाठी बनवलेल्या मलमाचा खूप मोठा उपयोग झाला तो म्हणजे काही वर्षापूर्वी कोल्हापूर येथे आलेल्या प्रचंड पुरामध्ये जनावरे अडकून पडली होती त्यांच्या पायांच्या जखमा बऱ्या करण्यासाठी. नागपूर मध्ये फार्मसी कॉलेजच्या मदतीने हे मलम मोठ्या प्रमाणात तयार करून ते कोल्हापूरला पाठवले होते त्यांनी खूप साऱ्या गाई म्हशी व घोड्यांचे पाय फंगल इन्फेक्शन पासून वाचवले.

२००६ साली २५ वर्षाची पेन्शनबल सर्विस झाल्यानंतर, त्यांनी काही आरोग्याच्या कारणामुळे, ऐच्छिक सेवा मुक्ती घेतली व त्यानंतर विविध हॉस्पिटल साठी व फार्मा कंपन्यांसाठी सल्लागार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. सीम्स हॉस्पिटलमध्ये डॉक्टर टावरी सरांसोबत इन्फेक्शन कंट्रोलमध्ये खूप काम करता आले. तो अनुभव आयुष्य समृद्ध करणारा होता. सध्या त्या ग्लोबल प्रॉडक्ट कमप्लायन्स या स्वीडीश कंपनीमध्ये टॉक्सिकॉलॉजिस्ट सल्लागार म्हणून मानद तत्त्वावर काम करत आहे.

नवीन पिढीचा मुख्य भर 'युज अँड थ्रो'वर असतो. नवीन नवीन कपड्याने कपाटं भरून वाहतात. महागड्या पार्टी वेअर कपड्यांचे काय करायचे हा मोठा प्रश्न असतो. तर दुसरीकडे गरीब घरातून कामासाठी, शिक्षणासाठी येणाऱ्या लोकांना आपणही चांगले कपडे घालावे अशी इच्छा असते. या दोन्हीचा मेळ साधण्यासाठी गेल्या सप्टेंबर पासून 'द इंडी थ्रिफ्ट' नावाचे कपड्यांचे दुकान देवनगर खामला येथे सुरू केले आहे.

दोन्ही मुलांची लग्न झाली आहेत. मुलगी व जावई ऑस्ट्रेलियामध्ये सरकारी नोकरीत आहेत. मुलगा व सून अमेरिकन कंपनीमध्ये कार्यरत आहेत. डॉ. श्रीनिवास शेलगावकर ४१ वर्षाच्या मेडिकल कॉलेजच्या वेळ खाऊ नोकरी मधून निवृत्त झाले आहेत . सध्या दोघांचाही देशोदेशी फिरण्याचा छंद ते जोपासत आहेत. त्यांच्या पुढील निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा.

---

**मार्च २०२४ मधील महत्त्वाचे दिवस –**

५ दासनवमी, ८ जागतिक महिलादिन, महाशिवरात्र, २३ जागतिक हवामानदिन, २४ होळी, २५ धूलिवंदन, २८ शिवाजीमहाराज जयंती (तिथीप्रमाणे), २९ गुडफ्रायडे, ३१ ईस्टरसंडे

---

# लेखिका माझी सासू – आशा बगे

**– सौ. दीप्ती राजेश बगे**

आई, माता, मावशी अशी मातृतुल्य नावं माझ्या सासूबाईंना लागू पडतात. लग्न होऊन मी बगेंच्या घरात आल्यावर ही सर्व नावं माझ्या सासूबाईंच्या बाबतीत लागू पडतात असं मला वाटतं. मला वाटलंच नाही की इतक्या मोठ्या लेखिकेच्या घरात आपण जाणार आहोत. हो 'आशा बगे' या माझ्या सासूबाई! महाराष्ट्राचे भूषण असलेल्या लेखिका. मी तिला मावशीच म्हणते कारण ती आणि माझी आई नागपूरच्या महालातल्या लहानपणीच्या मैत्रिणी. मी जेव्हा तिला पहिल्यांदा बघितलं तेव्हा दोन आठवणी मनात नेहमीच राहतात. एक तर तिचं जोरदार हसणं आणि गाणं गुणगुणणं. मी वर्धेची. तिथे लायब्ररीत मावशीची पुस्तक नव्हती त्यामुळे मी तिच्या कथा वाचल्या नव्हत्या. पण लग्न ठरल्यावर मला मावशीच्या कथांची फाईलच वाचायला मिळाली. खूप कळण्याचं ते वय नव्हतं पण तिची कथा मात्र मनात घर करून राहिली.

'पाणी' कथा वाचली तर अक्षरशः प्रसंग डोळ्यासमोर उभा राहिला. 'मारवा' कथा संग्रह वाचताना आमचाच वाडा डोळ्यासमोर उभा राहिला. कारण तिची कथा प्रत्येक कुटुंबातलीच आहे. मला नेहमी वाटतं की तिच्या त्या दोन डोळ्यांनी किती मोठ आकाश बघितलं असावं? आजूबाजूला घडणाऱ्या घटना, संवाद हे सर्व एवढ्याशा मेंदूत कसं काय घट्ट बसलेलं असेल मग माझ्या हळूहळू लक्षात आलं......

मावशीचं लिखाण पहाटे सुरू व्हायचं ते दहापर्यंत. ती त्या कथेवर सतत विचार करते. मुद्दे लिहून ठेवते आणि मन काठोकाठ भरलं की लिहायला सुरुवात करते. मधे तिला चहा पण लागतो बरं, कधी कधी नाही जमलं तर सरळ ठेवून देते. मग आमच्याशी चर्चा करते आम्हाला वाटलं तसं आम्ही सांगतो. तिला आमच्याशी

बोलताना काहीतरी धागेदोरे लागत असतीलच. गरज वाटली तर परत दुपारी लिहायला बसते. तिला लिहिताना हाच टेबल, हाच पेन असं काही नसतं. जिथे शांत असेल तिथे ती बसते. पण तिला खिडकीजवळ आवडतं. विचार करताना सहज खिडकी बाहेर नजर गेली की रस्त्यावरच्या लोकांच्या लकबीवरून तिला काही सुचत असेल, असं मला वाटतं. कथा मनासारखी झाली की एकदम खुश होऊन चहा करेल नाहीतर एखादा पदार्थ.

मावशीला गाण्याचा वारसा तिच्या आई-वडिलांकडून मिळालाय. ती नागपूरला महालातल्या चतुर संगीत महाविद्यालयात गाणं शिकली. नंतर चतुर संगीत विद्यालयाचे प्राचार्य निस्ताने मास्तर तिला आणि तिच्या आईला गाणे शिकवायला येत. तिचा आवाज खरंच गोड आहे. आवाजाचा गोडवा तिच्या तिन्ही मुलांमध्ये आला आहे. तिच्या नसानसांतच गाणं आहे. तिच्या कथेतून, कादंबरीतून गाणं उमटतंच उमटतं. मग त्या चीजा, ख्याल, मोठमोठ्या कलाकारांचे नाव हे सर्व त्यात सामावले जाते. तिच्या 'मुद्रा' कादंबरीतील नायिका गाणारीच दाखवली आहे. लिखाणामुळे तिचं गाणं म्हणणं मागे पडलं. तिची कथा जसजशी फुलत जाते तसं मनातलं ती कागदावर उतरवत जाते. तिचे प्रकाशक तिच्याच तोडीचे. मौज प्रकाशक श्री. पु. भागवत हे तिची कथा वाचून अभ्यास करून काही सुचवंत. तिला पटलं तर नम्रपणे ते ती लिहीत असे. प्रकाशक आणि लेखकही तेवढेच ताकदीचे असायला हवेत.

आशामावशीचा मातृसेवासंघाशी संबंध आला आहे. तिची मामी कै. चंपाताई वऱ्हाडपांडे या नागपूरच्या मातृसेवासंघाच्या सचिव होत्या. तसेच तिची विहीण कै. विशाखा कावळे ह्या हिंगणघाटच्या मातृसेवासंघाच्या अध्यक्ष होत्या. कमलाताई होस्पेट विषयी अत्यंत आदर आहे. मी आणि मावशी त्यांच्याविषयी बोलायचो. एकदा मावशी म्हणाली की आमच्या वाड्यात कमलाताई कपडे किंवा धान्य मागायला आल्यात. त्या काळात कमलाताई घरोघरी बाळंतिणींसाठी, निराधार बायकांसाठी मागायला जात. तशाच त्या देशपांडे यांच्या वाड्यात आल्या. तेव्हा त्यांना सांगण्यात आलं की आम्ही गरीब आहोत आम्ही काहीही देऊ शकत नाही. कमलाताईंनी बाजूला बघितलं की बाजूला धान्याच्या पोत्यांच्या थप्पीच्या थप्पी लागल्या होत्या. तेवढ्यात एका आजींनी कमलाताईंना आत बोलावलं व म्हणाल्या की कमलाताई आमचा माणूस पोतं तुमच्याकडे आणून देईल काळजी करू नका. म्हणजे कमलाताईना एवढं मोठं साम्राज्य उभ करण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागले असतील. हा प्रसंग कमलाताई होस्पेट ह्यांच्या नाटकात माझ्याआईने (वर्धेच्या कै. डॉ. सुनीता कावळे) टाकला आहे. हा प्रसंग एकदा मावशीनेच माझ्या आईला सांगितला होता.

आशामावशीचं व्यक्तिमत्व हसरं, सोज्वळ, नम्र पण कठीण प्रसंगाला तोंड देणारं आहे. तिला इतके अवॉर्ड मिळालेत पण कुठेही अहंकार दिसला नाही. 'भूमी' कादंबरीला साहित्य अकादमी अवॉर्ड मिळाला तर लोक अभिनंदन करायला घरी येऊ लागले. तेव्हा ती घरच्या साडीत होती. मग मी आणि माझ्या नणंदने साडी बदलवायला लावली. आपलं शरीर स्वस्थ राहण्यासाठी योगासने नियमित करते. फिरायला जाते. आतापर्यंत ती स्वयंपाकात पण मदत करायची. अजूनही आम्ही दोघी गप्पा मारतो. मग ती कधी कधी दुर्गाबाई भागवत ह्यांची एखादी रेसिपी पण सांगते, तर कधी इतर लेखक नाटककार यांच्या आठवणी सांगते. तिच्या कथांवर बरेच विद्यार्थी पी.एच.डी. करतात.

ती काही वर्षापासून ज्ञानेश्वरी वाचते. सद्गुरूकृपेने अध्यात्मिक लिखाणही करते. ज्ञानेश्वरीचा आनंद घेते. त्यातले उदाहरण आजच्या जीवनाला लागू होतात असे तिचं मत आहे. तिच्या लिखाणात ज्ञानेश्वरीतल्या ओव्या येतात. तिला इतर लेखकांचं वाचायला आवडतं, चांगलं गाणं ऐकायला आवडतं, क्रिकेट बघायला आवडतं, तसेच टी व्ही वरील सिरीयल ही बघायला आवडतात. तिला खून होणारे सिनेमे आवडतात. एखादा सिनेमा नीट नसेल तर ती म्हणते की आपण या सिनेमाची स्टोरी लिहू. तिच्या काही कथा टीव्हीवर दाखवल्यात. 'निवडुंग' ही कथा. अशी ती जीवनाचा आनंद घेते. वेगवेगळ्या फिल्मविषयी माझ्या मोठ्या मुलाशी गप्पा मारते. लहान मुलगा गाणं म्हणतो तर त्याच्याशी गाण्याविषयी बोलते. प्रत्येकाची नाडी तिला माहिती आहे.

तिच्या बऱ्याच मुलाखती झाल्यात. तिने सर्व गोष्टीचा आनंद घेतलाय. वय झालं असूनही आजही ती हळूहळू लिहिते सद्गुरूकृपा आणि जिद्दीने. तिचे अनुभव, न थकलेले डोळे, आकाशाएवढे साठलेलं दिसत तिच्या डोळ्यात आणि ते ती लेखणीने कागदावर अजूनही उतरवते...... सरस्वतीचा वरदहस्तच आहे नं !

---

## प्राची माहूरकर : एक ऊर्जावान व्यक्तिमत्त्व

**– माधुरी कानेटकर**

'पुनर्नवा इकॉलॉजिकल सर्व्हिसेस अँड इको डिझाईन सोल्युशन्स' ह्या अनोख्या नावाच्या आणि अनोखी सेवा देऊ करणाऱ्या नागपूर येथील आमच्या संस्थेचा भाग असलेली प्राची म्हणजे प्राची माहूरकर, उत्साह आणि नवनवीन कल्पनांचा अखंड स्रोत! पुण्यात एका चांगल्या सॉफ्टवेअर कंपनीत काम करत असताना तिचा पुण्यातील 'इकॉलॉजिकल सोसायटी' शी संबंध आला. परिसंस्था, पर्यावरण आणि मानव ह्यांच्या परस्पर संबंधांवर प्रकाश टाकणारा प्रकाश गोळे सरांनी तयार केलेला एकवर्षीय कोर्स ते स्वतः तेथे चालवत असत. प्राचीने तेथे प्रवेश घेतला

तो दिवस आणि नंतरचे वर्ष तिच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरले! आतापर्यंत धूसर धूसर दिसत असलेले अचानक स्वच्छ दिसू लागले होते. ज्याला आयुष्याचे ध्येय म्हणतात ते, ह्या वाटेने पुढे गेले तर सापडू शकेल अशी आशा वाटू लागली होती. तेव्हा तिथे शिकवणारे गुरुजन तर एवढे तळमळीचे की ते त्यांची तळमळ विद्यार्थ्यांमध्ये हस्तांतरित करीत. बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांचा कायापालट झालेला असे...! कोर्स पूर्ण झाल्यावर प्राचीने संस्थेसोबत पानशेत धरणक्षेत्रातील जैवविविधतेचा अभ्यास केला. तसेच केतकी घाटे आणि मानसी करंदीकर संचालित Oikos बरोबर काही काळ काम केले. हा अनुभव तिला 'पुनर्नवा' च्या वेळी कामी आला. (पुढे काही वर्षांनी Oikos च्या 'Traditional wisdom' ह्या सरकारी प्रोजेक्टमध्ये देखील तिने भाग घेतला.) त्यानंतर लवकरच पुण्यातील नोकरी सोडून तिने नवरा व दोन मुलांसह नागपूरला back migration म्हणजे घरवापसी केली. मधल्या काळात नागपूरजवळ मरगसूर येथे घेतलेले आठ एकर शेत आता तिला जोतायचे होते. कोर्सच्या त्या एका वर्षात शाश्वत जीवनशैलीचा केलेला अभ्यास आता प्रत्यक्षात उतरवायचा होता.

शेतात त्यानुसार मातीचे घर उभे केले. काही कुटुंबे मिळून सामुहिक शेतीचा प्रयोग देखील केला. शाश्वत जीवनशैली, आहारविहार, निसर्ग, पर्यावरण, परिसंस्था, सेंद्रिय शेती, झाडे, पक्षी, प्राणी ह्यांच्याशी संबंधित कितीतरी तज्ञ, हौशी अभ्यासक तसेच व्यावसायिक माणसे तिने अल्पावधीत शोधली, जोडली आणि जोडून ठेवली. ह्या सगळ्यांची नावे आणि संदर्भ तिला तोंडपाठ असतात.

नागपुरात २०११/१२ मध्ये स्थापन झालेला 'निसर्गायण' नावाचा, दिलीप कुलकर्णींच्या मूळ विचारांवर आधारित, शाश्वत जीवनशैली आणि विषमुक्त आहारविहाराशी संबंधित समविचारी लोकांचा एक ग्रुप आहे. प्राची आणि माझी पहिली भेट निसर्गायणच्या मिटिंगमध्ये झालेली आठवते. ग्रुपची जुनी सभासद असल्यासारखा तिचा सहज वावर पाहून माझ्या मनात तिच्याविषयी कुतूहल जागृत झाले होते, ती पुण्याहून आली आहे व पुण्याचा इकॉलॉजिकल सोसायटीचा ऑनलाईन कोर्स नागपुरात सुरू झाला आहे आणि त्यासाठी ती समन्वयक आहे असे कळले. कोर्सच्या दुसऱ्या वर्षीच्या बॅचमध्ये मी प्रवेश घेतला आणि माझा देखील एक अद्भुत प्रवास सुरू झाला. ह्या वर्षभरात Ecology आणि प्राची, दोन्हींची जवळून ओळख झाली. कोर्समध्ये शिकलेल्या गोष्टी अमलात आणायच्या म्हणून प्राची आणि आमच्या बॅचच्या पाच जणांनी मिळून 'पुनर्नवा' ची मुहुर्तमेढ रोवली.

शाश्वत जीवनशैलीचा पाया म्हणजे शुद्ध आहार विषमुक्त अन्नधान्य मिळविण्यासाठी बीज निर्विष असावे लागते हे उमगल्यावर तिने नागपुरात आधीपासून साजऱ्या होणाऱ्या बीजोत्सवात स्वतःला झोकून दिले. करुणाताई फुटाणे, वसंतभाऊ फुटाणे, सतीशभाऊ गोगुलवार असे तळमळीचे लोक ह्या बीजोत्सवाचे आधारस्तंभ

आहेत. त्यांच्या प्रेरणेने अनेक तरुण शेतकरी सेंद्रिय शेतीचे प्रयोग करत आहेत. ह्या ज्येष्ठ लोकांबरोबर आयोजन समितीत राहून बऱ्याच अभिनव कल्पना तिने गेल्या काही बीजोत्सवात राबविल्या आहेत. त्याअंतर्गत बरीच नवीन तरुण मुलेमुली नवनवीन कल्पना, उपक्रम बीजोत्सवात त्यांच्या presentation च्या माध्यमाने मांडताना दिसतात.

शेतीच्या कामात स्त्रियांचा सहभाग आणि योगदान हा तिच्या प्रचंड आस्थेचा विषय आहे. बीजोत्सवातील स्त्रियांचा सहभाग वाढावा ह्यासाठी तिचे प्रयत्न सुरू असतात.

जंगल आणि तेथील स्थानिक झाडे हा प्राचीचा आणि माझा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय सुरुवातीच्या काळात नवनवीन झाडे पाहणे, त्यांची ओळखण करणे आणि हंगामात त्यांच्या बिया गोळा करणे हा आम्हा दोघींचा जणू छंदच होता. बीजोत्सवात सेंद्रिय व स्थानिक शेतकी बियाणांचे प्रदर्शन आणि विक्री होत असते. ह्या धर्तीवर आपण जमा केलेल्या जंगली आणि स्थानिक शहरी झाडांच्या बिया देखील प्रदर्शनासाठी मांडाव्या ही कल्पना तिला सुचली. त्यानुसार २०१८ च्या बीजोत्सवात आम्ही पहिल्यांदा एका टेबलावर साधारण २६ जातीच्या जंगली झाडांच्या बिया प्रदर्शित केल्या. अर्थातच, नंतर दरवर्षी ह्या संख्येत भर पडत गेली. ह्या स्टॉलला लोकांनी तेव्हा आणि नंतरच्या बीजोत्सवात नेहेमीच प्रचंड प्रतिसाद दिला.

सेंद्रिय शेती करणे हा प्राचीचा छंद आहे. शेतात तज्ञ लोकांच्या सल्ल्याने निरनिराळे छोटेमोठे प्रयोग करीत राहणे, ह्या छंदातून मिळणाऱ्या बऱ्यावाईट अनुभवांतून समृद्ध होत पुढे जाणे आणि फसलेले प्रयोग देखील मोकळेपणी सांगणे हे तिचे अव्याहत सुरू असते. आमच्या ऑफिसमध्ये फोनद्वारे किंवा प्रत्यक्ष अशी सल्लामसलत, चर्चा नेहेमी सुरू असते. अपयशाचा तिच्यावर फार काळ अंमल राहत नाही असे वाटते. त्यातून घ्यायचा तो धडा घेऊन ती नवीन अनुभवासाठी पुन्हा सिद्ध असते. स्वतःला अद्ययावत ठेवण्याचा तिचा नेहमी प्रयत्न असतो. त्यासाठी नवीन तंत्राज्ञानाचा वापर करणे तिला आवडते. तिच्या सॉफ्टवेअर कंपनीतील अनुभवामुळे ती सहजपणे संगणक हाताळते. (माझे संगणकाचे प्राथमिक शिक्षण तिच्याकडूनच झाले.) समाजमाध्यमांवरील सहज वावर आणि त्वरित प्रतिसादाचे साधलेले तंत्र तिला तिच्या आवडत्या विषयाशी जोडून ठेवते. तिचा आवडता प्रांत किंवा कळकळीचा विषय असेल तर स्वतःच्या पूर्ण शक्तीनिशी त्यात झोकून देण्यासाठी सदैव तयार आणि त्यासाठी कोणाशीही, कधीही, कुठेही बोलायला भेटायला तत्पर असते.

प्राचीच्या शेतातील मातीचे घर बांधताना तसेच शहरातील नवीन घराची बिल्डिंग बांधताना आर्किटेक्ट (आणि पुनर्नवाचा महत्त्वाचा भाग) प्रद्युम्न

सहस्रभोजनींच्या मार्गदर्शनाखाली त्यात बरेच प्रयोग झाले; जसे शहरातील घरात Cavity wall, Filler roof, Solar grid, Sewage treatment plant इत्यादी. त्या प्रयोगांचे वर्षभर निरीक्षण केल्यानंतरच त्यातील तथ्ये सगळ्यांना सांगण्यात आली. त्याबद्दल अधिक माहिती हवी असेल तर तिच्या घरी भेट देऊन ह्या गोष्टी प्रत्यक्ष पाहता येतात.

आपले अनुभव, मते, विचार समाजमाध्यमांवर किंवा चारचौघांत निडरपणे मांडणे हे प्राचीचे वैशिष्ट्य आहे. गेल्या काही वर्षांत तिच्यातील Activist क्रियाशील झालेला मी बघते आहे. भरतवन, अजनीवन व फुटाळा विकास प्रकल्प इत्यादींची घोषणा जेव्हा झाली तेव्हा शहरातील उरलं सुरलं वृक्ष आच्छादन धोक्यात आहे हे लक्षात आल्याबरोबर जनआंदोलन उभे करण्यात तिचा मोठा सहभाग आहे. ह्यातील काही प्रकल्प आता रद्द झाले आहेत.. काही तात्पुरते स्थगित झाले आहेत.

गेली पाच वर्षे आम्ही एकत्र काम करतो आहोत. आम्ही दोघींनी सगळ्यात एंजॉय केलेला प्रोजेक्ट म्हणजे २०२० मध्ये NMC साठी WWF च्या वतीने नागपुरातील मध्यवर्ती भागातील वृक्षांची केलेली गणती (Tree census). ह्यात प्रत्येक झाडाची उंची, घेर, स्थान, जाती, प्रजाती, फॅमिली ही माहिती आणि Geo tagging केले आहे.

उत्साही, आनंदी, निर्भीड, स्पष्टवक्ती, खोचक विनोदी स्वभावाची प्राची तापट, हट्टी आणि टोकदार देखील आहे. पण अनुचित गोष्टी, अन्याय इत्यादी गोष्टींचा विरोध करीत असताना तिच्या स्वभावाचे negative भासणारे हे कंगोरे तीक्ष्ण शस्त्रासारखे काम करत असावेत. स्वतःचे अज्ञान उघड होईल ह्याची भीती न बाळगता कितीही किरकोळ प्रश्न विचारणे असो की जंगलाला लागून असलेल्या स्वतःच्या शेतातील घरात रात्री एकटे राहणे असो, तिच्या निडर स्वभावाची range एवढी मोठी आहे. प्राचीची ही प्रचंड ऊर्जा भविष्यात तिच्याकडून अनेक सकारात्मक कामे करून घेणार आहे ह्यात शंका नाही.

---

## अनुराधा मोहनी : व्रतस्थ विदुषी

**– विनीता हिंगे**

आपले कुटुंब आणि व्यवसाय याखेरीज समाजासाठी विचारपूर्वक काम करणाऱ्या स्त्रियांमध्ये अनुराधा मोहनी यांचे नाव महत्त्वाचे आहे.प्रत्येक काम त्या जीव ओतून करतात हे त्यांच्या सहवासातील व्यक्तीला जाणवते.

नागपूर आणि सेवाग्राम येथे विविध क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण काम त्या सातत्याने करीत आहेत. भाषातज्ज्ञ, लिंगभाव विशेषज्ञ आणि समुपदेशक म्हणून त्या निरनिराळ्या पातळ्यांवर काम करीत असतात. अनुराधाताईंना त्यांच्या कुटुंबातूनच भाषाप्रेमाचा

आणि समाजकार्याचा वारसा लाभलेला आहे. भाषातज्ज्ञ स्व. दिवाकर मोहनी हे त्यांचे वडील आणि स्व. कमलाबाई होस्पेट या स्व. दिवाकर मोहनी यांच्या आत्या. त्यांनी उभे केलेले काम व त्यांचे कर्तृत्व सर्वांना परिचित आहेच. अशा कुटुंबातून मिळालेल्या संस्कारांमुळे अनुराधाताईंचे काम स्वतंत्रपणे उभे राहिलेले दिसते.
लेखन, संपादन, समुपदेशन आणि समाजकार्य अशा विविध क्षेत्रातील त्यांचे काम अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असे आहे.

सध्या महाराष्ट्र राज्यभाषा सल्लागार समितीच्या त्या सदस्य म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वीही त्यांनी शासनाच्या विविध समित्यांवर काम केले आहे. मराठी भाषा धोरण, परिभाषा निर्मिती अशा समित्यांमधील त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे वडील स्व.दिवाकर मोहनी यांच्या 'शुद्धलेखनाचे तत्त्वज्ञान'या पुस्तकाचे संपादन त्यांनी केले आहे.त्यांचे आगामी 'विवाह संस्था, कुटुंब संस्था आणि स्त्रीमुक्ती' या विषयाला वाहिलेल्या पुस्तकही अनुराधा ताईंनी संपादित केले आहे. 'गांधीजन चरित्रमाला' या मालेतील पुस्तकाचे संपादन त्यांनी केले. मुलांसाठी आणि अर्थातच सर्वांना आवडेल अशी ही थोरांच्या चरित्राची मालिका आहे.

विवेकवादी विचारांचा वारसा चालवणाऱ्या 'आजचा सुधारक' या मासिकाचे त्यांनी तीन वर्षे संपादन केले. सध्या 'सर्वंकष'या त्रैमासिकाच्या त्या संपादक आहेत. वैचारिक लेखन, वैचारिक नियतकालिके आणि महत्त्वपूर्ण ग्रंथांचे संपादन करीत असताना त्यांनी गुलजार यांच्या कवितांचे अनुवादही केले आहेत. ते पुस्तकरूपाने प्रकशित झाले आहेत. यावरून त्यांची संवेदनशीलता आणि सर्जकता मनावर ठसते. अनुराधाताईंनी महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचलनालय विभागात बावीस वर्षे काम केले आणि सहाय्यक संचालक या पदावरून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. मराठी, संस्कृत आणि लोक प्रशासन या विषयात पदव्युत्तर पदवी व एल.एल.बी. पदवीही त्यांनी प्राप्त केली आहे. मिळवलेल्या ज्ञानाचा फायदा सामान्य माणसांना व्हावा यासाठी त्या प्रयत्न करतात हे विशेष! सामान्य माणसाला कायदा समजून घेता यावा यासाठी अनेक कायद्यांचा मराठी अनुवाद त्यांनी केला आहे. 'घरगुती हिंसाचार अधिनियम', 'माहितीचा अधिनियम', 'स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंधक अधिनियम' यांचे अनुवाद त्यांनी केले. 'भूमी-संपादन अधिनियम १८९४' या जनसामान्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयावरील पुस्तकाचे संपादन त्यांनी केले आहे.

लेखन, संपादन, अनुवाद याखेरीज समुपदेशनाचे त्यांचे कार्य विविध पातळीवर सतत सुरू असते. शालेय आणि महाविद्यालयीन मुलामुलींसाठी समुपदेशन करून त्यांचे प्रश्न सोडवण्याची अनुराधाताईंची कळकळ जाणवते. ज्यांना मार्गदर्शनाची खरी गरज आहे अशा मुलांपर्यंत पोहोचून त्यांना योग्य दिशा दाखवण्याचे मोलाचे काम त्या करीत आहेत.

भाषेच्या माध्यमातून मुलांना आत्मविश्वास मिळावा यासाठी त्या प्रयत्नशील असतात. यासाठी सेवाग्राम येथे झोपडपट्टीतील मुलांसाठी त्यांनी शाळा चालवली. कोरोनाच्या कठीण काळात मुलांना स्वतःच्या घरी बोलावून त्यांनी ही शाळा सुरू ठेवली. 'वाया गेलेली' असे समजली जाणारी मुले त्यांच्या या उपक्रमातून आत्मविश्वासाने पुढे आली. अनुराधाताईंच्या भाषाविषयक चळवळीचे सूत्रच असे आहे की, मुलांना त्यांचे हक्क मिळावेत, त्यांना स्वतःचे सूर गवसावेत, चांगला माणूस म्हणून स्वतःला घडवता यावे आणि निसर्गाशी मैत्री करता यावी. स्वतःला चांगल्याप्रकारे व्यक्त करता आले की मुले हिंसक होत नाहीत अशी त्यांची योग्य भूमिका आहे. प्रेम आणि समानता या मूल्यांवर त्यांचा विशेष भर आहे. त्यांच्या अशा स्वतंत्र चिंतनानुसार त्यांचे सातत्याने काम सुरू असते. नागपूर येथील निरीक्षणगृहातील बाल गुन्हेगार मुलांना शिकण्याचा हक्क मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले व स्वतः त्यांना शिकवले. मुलामुलींशी त्या हेतुपूर्वक संवाद करतात. केवळ संवादच नव्हे तर त्यांची जबाबदारी घेत अनेकांचे पालकत्व त्यांनी स्वीकारले आहे.त्यांच्याशी आत्मीयतेने नाते जोपासतात.अनुराधाताईंच्या ऋजु तसेच मृदु स्वभावामुळे सर्वांशी सहजतेने मैत्री जोडणे त्यांना शक्य होते. त्यांच्या विद्वतेचा त्यात अडसर येत नाही. इतरांच्या प्रश्नाचा कळकळीने विचार करीत आवश्यक तेथे कठोर होत योग्य तो सल्ला त्या देतात. मनुष्य स्वभावाचा सूक्ष्म अभ्यास असल्याने त्यांचे समुपदेशन परिणामकारक असते यात शंका नाही.

'लिंगभाव समानता' या विषयावर शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर कार्यशाळांचे आयोजन अनुराधाताई करीत असतात. वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण मुलांसंबंधी त्यांची दोन पुस्तके प्रकशित झाली आहेत. 'आपले जग बदलणारी मुले' व 'परिवर्तनाच्या वाटेवरची चिमुकली पावले' ही ती महत्त्वपूर्ण पुस्तके!

अनुराधाताई महिलांचेही समुपदेशन करतात. अनुभवावर पारखून, स्वतंत्र चिंतनातून नवे विचार त्या मांडतात. रूढ 'स्त्रीमुक्ती' विचारापेक्षा त्यांची भूमिका निराळी आहे. सत्तेच्या लालसेत न अडकता स्त्री आणि पुरुष दोघांनीही शांततापूर्ण व प्रेमपूर्ण सहजीवन जगावे, सर्वांना समान पातळीवर माणूस म्हणून जगता यावे, ठराविक साच्यात अडकू नये असे विचार त्या मांडतात. पुरुषसत्तेचे महिलांवर आणि मुलांवर होणारे वाईट परिणाम त्या सजगपणे बघतात व ते होऊ नयेत यासाठी सातत्याने काम करतात.

अनुराधाताईंचे सर्वच कार्य व्यक्तिगत पातळीवर अत्यंत कळकळीने आणि सातत्याने सुरू असते हे त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य. त्यामागे प्रसिद्धी हा उद्देश कोठेही दिसत नाही. आज प्रत्येक क्षेत्रात व्यावसायिक दृष्टिकोन अनुभवास येतो. त्या पार्श्वभूमीवर अनुराधाताईंच्या कामाचे निराळेपण विशेष उल्लेखनीय आहे. मूलगामी

चिंतन आणि कृतिशीलता यांचा अनोखा संयोग असणाऱ्या अनुराधाताईंच्या कार्याला अनेक शुभेच्छा.

---

## डॉ. प्रज्ञा आपटे : अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

**– विनीता हिंगे**

डॉ प्रज्ञाताई आपटे यांचे संत साहित्यावरील अभ्यासपूर्ण व्याख्यान मी ऐकत होते. अनेक सन्दर्भ देत परखड तरीही रसाळ असे त्यांचे संत नामदेवांवरील व्याख्यान मी ऐकले आणि भारावून गेले. दिलेल्या वेळेवर सुरू करीत, वेळेची मर्यादा काटेकोरपणे पाळीत त्यांचा विषय निर्भीडपणे मांडणारी अनेक भाषणे पुढे ऐकता आली. किंबहुना त्यांचे व्याख्यान कधीच चुकवू नये असे अनेकांप्रमाणे मलाही वाटू लागले. प्रज्ञाताई सर्वांची मने तृप्त करणाऱ्या 'वक्ता दशसहस्रेषु'आहेत याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे.

त्यांचे लेखनही असेच अत्यंत मुद्देसूद. त्यामुळेच ते महाराष्ट्रात सर्वदूर पोहोचले आहे. मराठी विषयाच्या व्यासंगी प्राध्यापिका, लेखिका, समीक्षक, उत्कृष्ट वक्त्या असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या प्रज्ञाताई आपटे यांचे कार्य गेली साठ वर्षे अविरतपणे सुरू आहे. त्यांचे प्रसन्न, निगर्वी व्यक्तिमत्व प्रेरणादायी आहे. एक शिस्तप्रिय, तत्त्वनिष्ठ प्राध्यापक म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. मातृसेवासंघ संचलित समाजकार्य महाविद्यालयातून त्यांनी मराठी अध्यापनाचे कार्य सुरू केले. पुढे नागपुरातील एस.एफ.एस.महाविद्यालयात अनेक वर्षे काम करून त्या निवृत्त झाल्या. तेथे त्यांनी अमराठी विद्यार्थ्यांना इंग्रजीतून मराठी शिकविले. तसेच अमराठी अभ्यासकांना मराठी शिकता यावे यासाठी पाच पाठ्यपुस्तके लिहिली. अध्यापनाच्या क्षेत्रातील त्यांचे हे आगळेवेगळे काम.

'चू मराठी' ही मराठी व्याकरणावर व निबंधालेखनावर त्यांनी लिहिलेली पुस्तिकाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रौढ शिक्षणासाठी त्यांनी पाच पुस्तिका लिहिल्या. शालेय विद्यार्थ्यांकरिता मराठी विषयाची पाठ्यपुस्तके तयार केली.आय.ए. एस. एम. पी.एस.सी.अशा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे मार्गदर्शन केले. निवृत्तीनंतरही अनेक विषयांवर अनेकांना त्या सतत मोलाचे मार्गदर्शन करीत असतात. विविध विषयांचा त्यांचा व्यासंग थक्क करणारा आहे. सतत वाचन, चिंतन, मनन यातून मिळवलेले ज्ञान त्या मुक्तहस्ताने सर्वांना देत असतात.वय, प्रकृतीच्या तक्रारी यांचा अडसर त्यात कधीही येऊ देत नाहीत. ज्ञानदानाचा त्यांचा उत्साह सर्वाना थक्क करणारा आहे.

भाषा, साहित्य यांच्या माध्यमातून संस्कृतीची आणि समाजाची सेवा त्या व्रतस्थपणे करीत आहेत. त्यांचा संशोधकाचा पिंड त्यांच्या पु.य.देशपांडे यांचे

कादंबरीविश्व, प्रतिमा इंगोले यांचे कथाविश्व, अक्षरवेल, जावे कवितेच्या गावा, या समीक्षात्मक ग्रंथांमधून दिसतो. तर त्यांचे संवेदनशील मन त्यांच्या 'तृणकुसुम' 'उरतील अंतरी तेजाचे क्षण'अशा प्रसन्न, टवटवीत लेखसंग्रहातून प्रकट होते.

प्रज्ञाताईंचा संत साहित्याचा व्यासंग अत्यंत दांडगा आहे. मराठी व हिंदी संतसाहित्य, तत्कालीन समाज यांचा सखोल अभ्यास करीत त्यांनी आजच्या समाजहिताच्या अंगाने संत साहित्यावर विचार मांडला आहे. 'संतांचे देणे' 'संतांची नवसमाज निर्मिती' 'अमृतकण कोवळे' त्यांच्या पुस्तकांची शीर्षके प्रज्ञाताईंच्या विचारांची दिशा स्पष्ट करतात. ज्ञानेश्वरीचा देखील आध्यात्मिक, साहित्यिक अंगाने विचार करण्यापेक्षा त्यांना ज्ञानदेवांची समाजशीलता अधिक आकर्षित करते. संपूर्ण ज्ञानेश्वरीतील अशा ओव्यांचा सूक्ष्म अभ्यास त्यांनी केला आहे. पसायदान हे नवसमाज निर्मितीचे स्वप्न आहे असे त्या म्हणतात. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, रामदास व संत कवयित्री यांच्यावर 'एन्सायक्लोपीडिया ऑफ हिंदुइझम'(अमेरिका) यामध्ये प्रज्ञाताईंनी टिपणी लिहिलेली आहेत. नागपुरातील विदर्भ संशोधन मंडळ, विदर्भ साहित्य संघ, अभिव्यक्ती, पद्मगंधा, रसिकराज, महिला क्लब या संस्थांनी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे. ही यादी बरीच मोठी आहे. सर्व पुरस्कारांच्या, गौरवांच्या पलिकडे पोहोचणारी त्यांची विद्वता आहे हे निश्चित.

नाट्यअभिनय, विविध संहिता-लेखनांतून उत्तम लेखकांचे साहित्य जनसामान्यांपर्यंत पोहोचवले आहे. आकाशवाणी तसेच विविध वृत्तपत्रे, नियतकालिके यातून अनेक अभ्यासपूर्ण लेख त्या सातत्याने लिहीत असतात. त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वातील सर्व पैलूंविषयी एकाचवेळी सांगणे अवघड आहे.

प्राध्यापकांसाठी आयोजित विविध कार्यशाळांमध्ये त्यांना व्याख्यानासाठी आमंत्रित केले जाते. नागपुरातील पद्मगंधा या संस्थेच्या नुकत्याच झालेल्या साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्ष होत्या. विदर्भातील लेखकांच्या साहित्याचा त्यांचा सूक्ष्म अभ्यास आहे. आणि त्यांची वैशिष्टये प्रकाशात आणण्याचा त्यांचा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे. साहित्यविषयक नवनवीन प्रकल्पात त्यांचा सहभाग असतो आणि अशा उपक्रमात इतरांना सहभागी करून घेत त्यांना प्रेमाने मार्गदर्शन करण्याचा स्वभाव अनेकांना त्यांच्याकडे आकर्षित करतो. महत्त्वाचे अनेक प्रकल्प त्यांच्याकडून पूर्ण होवोत यासाठी त्यांना निरामय आरोग्य लाभावे ही प्रार्थना!

---

## सुप्रिया अय्यर : बहुआयामी व्यक्तिमत्व

**- विनीता हिंगे**

मराठी साहित्य क्षेत्रात कथाकार आणि कादंबरीकार म्हणून सुप्रिया अय्यर हे नाव सुप्रसिद्ध आहेच. परंतु त्यांनी इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय

नागपूर येथे मेडिको सोशल वर्कर म्हणून अनेक वर्षे काम केले आहे हे कदाचित अनेकांना माहिती नसावे. मातृसेवासंघ संचलित समाजकार्य महाविद्यालयातून एम्.एस्.डब्ल्यू. ही पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी त्यांच्या कामाला सुरुवात केली. शासकीय रुग्णालयातील दैनन्दिन कामाशिवाय महाराष्ट्र शासनाच्या 'एड्स कंट्रोल सोसायटी'वर त्या अनेक वर्षे कार्यरत होत्या. महाराष्ट्र शासनाची रिसोर्स पर्सन म्हणून एड्स संदर्भात विदर्भातील अनेक जिल्ह्यात सेमिनार चर्चासत्रे यामध्ये सहभागी होऊन त्यांनी शहरी व ग्रामीण भागात या विषयासंबंधी जागृती केली. एड्स कार्यकर्ता म्हणून नागपूर महानगरपालिकेकडून त्यांना पुरस्कृत करण्यात आले आणि त्यांचा सत्कार केला गेला. त्यांच्या अथक कार्याची ही पोहोचपावती म्हणता येईल.

मेडिको सोशल वर्कर म्हणून सरकारी दवाखान्यात काम करीत असताना सुप्रियाताईंना समाजातील विविध स्तरातील स्त्रीपुरुष, बालके यांच्या समस्या हाताळाव्या लागल्या. त्यांनी अर्थातच कणखरपणे आणि संयमितपणे समुपदेशन केले असणार.परंतु त्यांच्यातील संवेदनशील लेखिकेने हे सारे अनुभव टिपून वाचकांपुढे कलाकृतीच्या रूपात ते ठेवले. त्यांच्या मनात उठलेली खळबळ भावनोत्कटपणे त्यांच्या साहित्यकृतीत उतरली. यातूनच त्यांची 'अजन्मा' सारखी अजोड कादंबरी जन्माला आली. त्यातील नायिका शिल्पी मुजुमदार ही मेडिको सोशल वर्कर आहे आणि तिला आलेल्या असंख्य अनुभवांनी ती व्यथित झाली आहे. स्त्रीसमस्यांचे अनेक पैलू या कादंबरीत उलगडतात. समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उमटतेच. साहित्यिक हा हस्तिदंती मनोऱ्यात राहणारा असल्यास त्याचे साहित्य लोकप्रिय होत नाही.

सुप्रियाताईंनी तर दररोज समाजातील सर्व स्तरातील माणसांच्या शारीरिक, मानसिक वेदना अनुभवल्या. या वेदनांना त्यांच्या कथा, कादंबरीतून उद्गार लाभला. सर्जनशीलपणे सामाजिक समस्या मांडण्याचे त्यांच्या लेखणीचे कौशल्य वाचकांच्या पसंतीला उतरले आहे. सामाजिक समस्यांवर सखोल विचार करीत सामान्य लोकांना विचारप्रवण करण्याची ताकद त्यांच्या लिखाणात आहे. त्याचमुळे त्यांच्या सर्वच कथासंग्रहांना आणि सर्वच कादंबऱ्यांना मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. विदर्भ साहित्य संघ, पद्मगंधा संस्था, आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी यांचेकडून तसेच इतरही संस्थांकडून अनेक मानाचे पुरस्कार त्यांच्या कलाकृतींना दिले गेले. 'उन्हे वेचता वेचता' 'चांदणचुरा' 'आणि काही शुभ्र कमळे' असे त्यांचे ललित लेखनाचे संग्रह प्रसिद्ध आहेत. 'तिमिरातून उदयाकडे' हे त्यांचे शब्दांकन तसेच आकाशवाणीसाठी त्यांनी लिहिलेल्या अनेक श्रुतिका, कथा, लेख सर्वांना भावले. नाट्यलेखनासाठी त्यांना दिल्ली आकाशवाणीचा पुरस्कार मिळाला आहे. दूरदर्शनवर त्यांच्या कथांची नाट्यरूपांतरे प्रसारित झाली आहेत. माध्यमांतर ही त्यांच्या लेखणीला सहजसाध्य आहे हे विशेष. वृत्तपत्रीय पुरवण्यांमधून त्यांचे लेखन घराघरात पोहोचले. वऱ्हाडी

भाषेतील त्यांच्या कथा सर्वांच्या पसंतीस उतरल्या आहेत. 'बंडी उलार झाली' या कथास्पर्धेत त्यांना प्रथम पुरस्कार लाभला. त्या प्रभावी कथाकथनही करतात.

त्यांचे कथाकथनाचे कार्यक्रम महाराष्ट्रात आणि अमेरिकेतही गाजले आहेत. विविध साहित्य संमेलनातील त्यांचा सक्रीय सहभाग उल्लेखनीय आहे. सिंगापूर येथील विश्वसाहित्यसंमेलनात त्यांनी नागपूर नगरीचे नाव उंचावले. सुप्रियाताईंना तीव्र स्मरणशक्ती तसेच उत्तम विनोदबुद्धी लाभलेली आहे.

समाजकार्य आणि साहित्य लेखन एवढेच त्यांचे कार्य मर्यादित नाही तर त्या 'कुशल संघटक पुरस्कार' प्राप्त अशा प्रभावी संघटक आहेत. 'अभिव्यक्ती' या वैदर्भीय लेखिकांच्या संस्थेच्या अध्यक्ष म्हणून त्या गेली अनेक वर्षे काम करीत आहेत. त्यांची सर्वांशी मैत्रीपूर्ण वागणूक सर्वांना प्रोत्साहन देते. 'योजकस्तत्र दुर्लभ:' या उक्तीचा प्रत्यय येणाऱ्या आजच्या काळात त्या अनेक कल्पक कार्यक्रमांचे नेटके आयोजन करतात.

नागपूर येथे झालेल्या जागतिक साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांचा सहभाग होता. महाराष्ट्र शासनाच्या वाङ्मय पुरस्कार समितीवर १९९४ ते १९९८ पर्यंत त्यांनी काम केले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या साहित्य आणि संस्कृती मंडळावर २०१५ ते २०१९ पर्यंत त्यांनी काम केले आहे. आकाशवाणीच्या अंतर्गत 'अर्काईव्हज' या प्रकल्पात त्यांनी काम केले आहे. अखंड काम करताना लेखनाची उर्मी जोपासली आहे हे त्यांचे वैशिष्ट्य. कामाच्या धबडग्यात पहाटे उठून लेखन करण्याची त्यांची असोशी विलक्षण म्हणावी लागेल. त्यांची लेखनस्फूर्ति आणि ऊर्जा अखंड रहावी यासाठी त्यांना उत्तम आरोग्य लाभावे हीच सदिच्छा!

---------------------------------------------

## Dr. Kirty Arun Sirothia

Dr. Kirty Arun Sirothia, a retired Associate Professor of Veterinary Pathology from Nagpur Veterinary College, Maharashtra Animal & Fishery Sciences University, has a distinguished academic and professional background. She earned her B.Vsc & A.H. from Nagpur Veterinary College in 1979 and completed her M.V.Sc. in Veterinary Pathology from the Post Graduate Institute, Dr.PDKV, Akola in 1981 and subsequently specialized in Fish Pathology in Ph.D. Notably, she became the first lady academic teaching staff at Dr.PDKV, Akola, in the Veterinary Faculty in 1981."Throughout her 36 years of university service, Dr. Sirothia held various responsibilities in teaching, research, extension, student welfare, and served as the Chairperson

of the University Women's Cell. She had the unique opportunity to teach courses in Veterinary, Agriculture, and Wildlife at Forestry College due to her deputation to Agriculture and Forestry Colleges.

Dr. Sirothia also completed several courses in management, women studies, gender studies, rural development, and HRD from prestigious academies in Hyderabad.“In recognition of her dedication, she received the Dr.PDKV University Best Teacher Award in 1996. Dr. Sirothia further expanded her academic pursuits by obtaining additional qualifications in sociology and counselling. She is now providing counseling services to specially-abled persons and geriatric patients.“Passionate about organic farming and animal husbandry, Dr. Sirothia, along with her husband Dr. Arun Sirothia, a retired Professor of Animal Genetics and Breeding, manages DHRUV NATURE PARK. They actively promote agrotourism, organic farming, and sustainable regenerative practices, emphasizing local animal and plant germplasm, water conservation, and ecological preservation.

Beyond her academic and farming pursuits, Dr. Sirothia is actively involved in various professional societies, including the Indian Association of Women Vets, Indian Association of Veterinary Pathologists, Vidarbha Industries Association Agro RD Forum, Association of Counselors and Psychotherapists Nagpur, and The Australian Sociology Association. “Dr. Sirothia's global engagement extends to her participation in training and conferences in the USA, Japan, Singapore, Australia, and Bhutan. Her multifaceted contributions in academia, agriculture, and societal well-being underscore her remarkable career and commitment to diverse fields.

---

## सौ. साधना जोशी

मी साधना जोशी, पूर्वीची साधना पाठक. माझं माहेर मलकापूर बुलढाणा जिल्ह्यातील. आमचं घराणं पौरोहित्याचं. आम्ही ७ भावंडं. ५ भाऊ २ बहिणी. घरची परिस्थिती हलाखीची. फक्त भिक्षुकीवर आईचा संसार चालायचा.

अनुभवातून माणूस शिकतो असं म्हणतात, ते काही खोटं नाही. लहानपणापासून घरची परिस्थिती कशी आणि कधी सुधारणार हा विचार वयाच्या

१२ व्यावर्षापासून डोक्यात शिरला. शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे कळलं होतं पण शिक्षण घेणेही कठिण होतं कारण त्याला लागणारा पैसाच नव्हता. घरात एक वेळ जेवा तर दुसऱ्या वेळेची वाट बघा असं होतं. अत्यंत कष्टाने बी.कॉमपर्यंतचे शिक्षण पुरे केले. लग्नानंतर काही तरी करायचं या विचाराने, हिमतीने साधना उभी झाली.

मुलगा ४-५ वर्षाचा होता तेव्हा ५/६ वर्ष भांड्याचे दुकान चालवले. त्यातच कुरडई, सांडगे, चकली करुन विकले. सोबतच साड्या पिको फॉल करायची. त्याचवेळेत आम्ही लक्ष्मीनगर ला १ रूम किचन असा फ्लॅट घेतला तो गच्चीवर होता. इथे यायचं तर मात्र ते दुकान बंद करावं लागलं. सर्व देणे घेणे करून मी त्या व्यवसायाला राम-राम केला आणि लक्ष्मीनगरला आलो तेव्हा मात्र १ वर्षाची मुलगी होती. आता मोठा अमोल आणि लहान मधुरा, असं माझं घर आणि आम्ही दोघं. इथे आल्यावर काय करावं हा खूप मोठा प्रश्न होता. भांडवल कुठून आणायचं इथपासून सुरुवात. मिस्टरांची एसबीआयला नोकरी होती पण ग्रॅज्युएट नसल्यामुळे पगार अतिशय कमी. विचार करता करता डबे सुचले आणि तसं सुरू केलं. गरजवंताना डबे देण्याचे ठरले. आणि म्हणता म्हणता रोज १५ डबे करावे लागत असे.

मीच पोळी करणार, भाजी चिरणार, डबे भरणार आणि देणार असा कार्यक्रम सुरू झाला. या डब्यांमधे एसबीजे, आरबीजे ला पण १५/२० व्यक्तिंचे जेवण देत असे, जे पाहिजे ते. करता करता ३०/४० लोकांचे जेवण देणे सुरू केले. कुणाचीही नाराजी दिसली नाही. विश्वासच बसेना की मी चांगलं जेवण बनवते. पण तो समोरच्या व्यक्तींकडून मिळाला.

एक दिवस आमच्या अपार्टमेंटचे ज्येष्ठ नागरिक (काका) काकांनी विचारलं तू बिझीनेस वाढवायचं म्हणत होतीस तर तुला एक ऑर्डर देतो करशील का?

मग काय ताबडतोब होकार दिला. शंभर व्यक्तिंना २ बटाटा वडा, १ वाटी शिरा आणि चहा असा कार्यक्रम होता. म्हटलं छान संधी आहे सोनं करून घ्या. ह्याचा खर्च मी त्यांना १२०० सांगितला. ते म्हणाले की आम्ही १० रु. प्रति व्यक्ति प्रमाणे जमा केले. विचार केला आणि घेतला. नफा तोटा बघायचा होता.

या ऑर्डरमध्ये मीच पूर्ण मेनू बनवला आणि सगळं काम मीच केलं.

मला कष्टाचा पुरेपूर अनुभव होताच. पण वेटर, कुक, बाई यांचा सुद्धा अनुभव आला. त्यातच मी पुरणपोळ्या करून द्यायची आणि ३०/४० लोकांचे ऑर्डर सुरू केले आणि बघता-बघता वर्ष निघून गेले. त्यातच आमचे एक नातेवाईक आमच्या घराजवळ राहायचे. साधारण परिस्थिती होती. मी ऑर्डर घेते हे माहित होते त्यांना. त्यांच्या मुलीच्या लग्नाचे काम मी घेतले आणि ३५०००/- त्याचे ७०० व्यक्तींच्या जेवणाची ऑर्डर मी करून दिला. त्यात विहिणीचीपंगत, डेकोरेशन, नाश्ता, शिदोरी, लाडुचिवडा हे सगळे आले आणि या वेळेपासूनच धावायला

सुरुवात झाली. त्यातच मी रांगोळी, डेकोरेशन पण केले. मोठमोठे गालीचे मी काढायची. रांगोळी काढता-काढताच मी आजुबाजुला बघायची की मी हे काम करू शकते, घरून थोडा विरोध झाला कारण यात वेळेच बंधन नसतं. स्वतःला वेळ देता येत नाही. वगैरे पण माझ्या डोक्यात बसलं ते बसलं. आणि समोर बघत गेले. आज तुमच्या समोर उभी आहे मधुरा कॅटरर्सची साधना जोशी.

नागपूरातील ९०% हॉलमधे मी कॅटरिंग सर्विस दिली आहे तसेच लॉनमधे पण आणि घरी सुद्धा माझ्या नजरेत ५० व्यक्तिंच्या जेवणाचे महत्त्व ५०० व्यक्तिंच्या बरोबरीत आहे.

कामाकामातून ओळखी आणि ऑर्डर असा प्रवास आजपर्यंत सुरू आहे. आज व्यवसायात ३५ वर्ष आणि खूप प्रेमाचा गोतावळा जमला आहे. काहीतर जीवाला जीव लावणारे आहेत. कारण त्यांचे लग्न आणि बाकी कार्यक्रम घरचं समजून केले. त्यांचा पैसाही वाचवाला आणि मी पण कमवले.

आज माझा मुलगा एमबीए झाला. मुलगी आर्किटेक्ट! आणि दोघांचेही लग्न झाले. आणि आता स्वतंत्र मोकळ्या मनानी पुन्हा आपल्या व्यवसायासाठी उभी आहे. बरच काही कमवण्यासाठी. पैसा सर्वस्व नसतो तर जीव लावणारी माणसं जोडली आहेत!

---------------------------------------------

## चैताली भस्मे – सर्पमित्र

शिक्षण – MSW - Master of Social Work, Specialization in Medical Psycatrics. पत्ता – मनीष नगर, नागपूर, महाराष्ट्र.

(चैताली भस्मे ह्या नागपूरच्या महिला सर्पमित्र, वन्यजीव रक्षक, प्राणीमित्र, सामाजिक कार्यकर्त्या, आकाशवाणी नागपूर मध्ये लेखिका, कवियत्री, अभिनेत्री, voiceover आर्टिस्ट, डबिंग आर्टिस्ट, साहित्यिका, गीतकार आणि मांगल्य बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका व अध्यक्षा आहेत)

चैताली भस्मे यांना वयाच्या १३ व्या वर्षापासूनच सामाजिक जाणीव, गोरगरिबांची दया, प्राणीमात्रावर प्रेम भावना आहे. अवघ्या १३ व्या वर्षापासून बेवारस पशू, पक्षी, जनावरे, साप यांना रेस्क्यू करुन तसेच जखमी वन्यजीव, बेवारस जनावरांवर उपचार करून त्यांना निसर्गात मुक्त करण्याचे काम करत आहे. साप बघता बरोबर त्यांना आनंद व्हायचा त्यातून त्यांची रुची वाढत गेली व त्यातून नैसर्गिकरित्या साप पकडण्यास सुरवात झाली... एक मुलगी असल्यामुळे त्यांना आपल्या आस्तित्वसाठी आवडीच्या कामासाठी खूप संघर्ष करावा लागला अनाथ श्वान, पक्षी, वन्यजीव, ज्यांची आई अपघातात मृत्यू पावली, अश्या पिलांना आई बनून आधार देते, वाढवते व नंतर ते मोठे झाल्यावर त्यांना निसर्गात मुक्त करून देते,

अनाथ श्वानांचे दत्तक विधी पूर्ण करते. आतापर्यंत हजारो सापांना, मुके जनावर, पशू, पक्षी, वन्य जीव, पाळीव प्राणी यांना जीवनदान दिले आहे.

चैताली यांनी कॉलेज मध्ये असतानाच सन् (२००५) मध्ये मांगल्य बहुउद्देशीय संस्थेची स्थापना केली, त्या संस्थेच्या अध्यक्षा व संचालिका आहे. सन २००५ पासून ते आजतागयत चालू वर्ष (२०२४-नियमित) संस्थेला कुठल्याही प्रकारचे मानधन वा शासनाकडून अनुदान प्राप्त होत नसताना सुद्धा एकटीने स्वत:च्या बळावर अत्यल्प मनुष्यबळात संस्था चालवत निराधार, गरजू गरीब लोकांची नि:स्वार्थ भावनेनं मदत करीत आहेत. तसेच संपूर्ण महाराष्ट्र राज्यात संस्थेद्वारे वेगवेगळे समाज उपयोगी उपक्रम राबवत सर्वप्रकारची सामाजिक सेवा प्रदान करत आहेत.

मांगल्य बहुउद्देशिय संस्था ही मानव तसेच पशू, पक्षी, प्राणी, वन्यजीव व पर्यावरण यांसाठी कार्य करते. सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय तसेच इतर क्षेत्रांमध्ये आपली निःशुल्क सामाजिक सेवा प्रदान करत असून सम्पूर्ण महाराष्ट्र राज्यात कार्यरत आहे.

कोरोना काळात सर्व बंद बंद असल्याने पशू पक्षी जनावरे यांची पण फार गैरसोय झाली. कोरोना काळात साप rescue केले, त्याबरोबरच हॉटेल्स बंद झाल्यामुळे रस्त्यावरील श्वानांना उपासमार होत होती, त्यावेळी चैताली यांनी भुकेलेल्या बेवारस श्वांनाना जेवणाची व्यवस्था केली कोरोना काळात, मजूरवर्ग, गरजू, गरीब लोक यांना अन्नदान तसेच रेशन वितरीत केले. पशू, पक्षी यांना जेवणाची व्यवस्था केली त्याप्रमाणेच कोरोना ग्रस्त रुग्णांना जे होम कोरांटाई होते त्यांना घरपोच निःशुल्क टिफीन सेवा, गरीब झोपड्यांमध्ये रेशन वाटप, जेवण वाटप, रेल्वे बंद असल्यामुळे अडकलेल्या बाहेरच्या मजूर वर्गाला जेवण वाटप, औषधी, मास्क, सेनिटायझर वाटप., ई. आणि कोरोना बद्दल जनजागृती केली.

मांगल्य फाउंडेशन zero Snake Bite मिशन अंतर्गत कार्य करत असून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सर्प जनजागृतीचे कार्य करते. त्यांना Snake Bite झाली नाही. चैताली यांनी लोकांना सापांना मारण्यापासून प्रतिबंध करत. हजारो सापांना जीवनदान दिले आहे. चैताली यांनी सर्व प्रकारचे विषारी सापांना पकडले आहे. त्यांस Rescue करून सुरक्षित रित्या नैसर्गिक अधिवासात सोडलं आहे.

मांगल्य बहुउद्देशीय संस्था ही हिवाळ्यात अतिशय दुर्गम आणि आदिवासी भागात जिथे शासन पोहोचत नाही शासकीय योजना पोहोचत नाही अश्या ठिकाणी कपडे वाटप प्रोग्राम घेते. तसेच निराधार, गरजू, दिव्यांग लोकांना कपडे वाटप, प्रत्येक वर्षी ठिकठिकाणी वृक्षारोपण हे संपूर्ण वर्षभर नित्यक्रमाने चालूच राहते, अन्नदान, नैसर्गिक आपत्तीत लोकांचे पुनर्वसन करणे, संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लोकांना सर्व प्रकारचे मोफत जॉब लावून देणे, दिव्यांग गोर गरीबांचे मोफत वैद्यकीय उपचार,

मेडिकल ऑपरेशन करून देणे, शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, इत्यादी सर्वांना उपयोगी अशी कामे करते.

नागपूरमध्ये एकमेव महिला सर्पमित्र प्राणीमित्र तसेच वन्यजीव रक्षक असल्याने अनेक संकटांना सामोरे जाऊन स्वतःचे अस्तित्व टिकवण्याची धडपड सतत सुरू असते.

---

## सौ. तृप्ती प्रशांत नेरकर

**– सौ. रागिणी बक्षी**

हे भगवती माते, असे वरदान दे की ह्या आजच्या दिवशी आमचे तुझ्या संकल्पशक्तीस अधिक पूर्ण आत्मदान होईल. तुझ्या कार्यासाठी आम्ही स्वतःचे अधिक सर्वांगीण दान करू शकू. आम्हाला अधिक पूर्णत्वाने आत्मविस्मृती होईल. हे माते, आम्हाला तुझे या जगातील प्रकाश ज्योतीचे वाहक बनव. अशी आर्त प्रार्थना करणारे महायोगी श्रीअरविंद व श्रीमाताजी यांच्या अध्यात्मिक जीवन प्रवासाच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत आणि त्यांनी विस्तारून प्रशस्त केलेल्या मार्गावर आपले मातीचे पाऊल ठेवण्याची एक संधी आठ वर्षांपूर्वी माझ्या आयुष्यात अवचित आली. फेब्रुवारी २०१६ मध्ये माझ्या आई आणि मामाबरोबर पाँडीचरी येथे श्री श्रीकृष्ण दीक्षित पुणे आयोजित मराठी स्वाध्याय शिबिराला जाण्याचा योग आला. आणि माझ्या आयुष्याला कलाटणी देणारं एक सुंदर वळण माझ्यासमोर उभा टाकलं. खरंतर मी नुकतीच आयटी कंपनीमधली माझी नोकरी सोडली होती. एका सामान्य पठडीतलं खूप स्वतःकडून आपल्या करिअरच्या बाबत उच्च आकांक्षा असलेली, असलेल्या मला अचानक नोकरीचा कंटाळा यायला लागतो काय आणि त्याचं पर्यावसन नोकरी सोडण्यात होतं, काय सगळं अगम्य पण होईल झालं खरं असं. भरपूर पगाराची नोकरी सोडण्यासाठी महत्त्वाचं होतं घरातील आर्थिक गणित जुळणं परंतु जोडीदाराची हिम्मत व मुलाची समाधानी वृत्ती यांनी नोकरी सोडण्याचे बळ मिळालं. व म्हणतात ना की परमेश्वर तुमच्यासाठी आधीच योजना करून ठेवतो आणि अगदी तंतोतंत तसंच झालं. माझी आई ही जन्मभर मार्गदर्शनाचे कार्य करणारी आपली आई! जन्मदात्र्या आईने मला पाँडिचेरीला नेऊन जगन्मातेच्या पायावर घातलं आणि संपूर्ण आयुष्य एका उच्चतर ध्येयाच्या वाटेवर मार्गस्थ झालं. श्रीअरविंदाने भारतीय योगाशास्त्रामध्ये मांडलेल्या वेगळ्या संकल्पना राष्ट्र कार्यातील त्यांचा सहभाग, प्रखांड अक्षर वाङ्मय, त्यांचं लौकिक व अध्यात्मिक जीवन स्वातंत्र्य स्वातंत्र्यसंग्रामकाळात लाल-बाल आणि पाल यांच्या समवेत त्यांनी केलेल्या जनजागरण. त्यांच्या अध्यात्मिक सहयोगिनी श्रीमाताजी यांचं त्यांच्या समग्र योगसाधने मध्ये असलेलं परिपूर्ण योगदान, असे अत्यंत व्यापक व उच्च ध्येयाने

दिव्य झालेले त्यांचे जीवन, याचा विस्तृत परिचय व्हावा म्हणून १९९१ सालापासून म्हणजेच गेली ३२ वर्षे अथक परिश्रमांनी श्री. दीक्षितकाकांनी या स्वाध्याय शिबिरांचे आयोजन करायला सुरुवात केली. नैनिताल, दिल्ली, रायवाला (ऋषिकेश) व पाँडिचेरी येथे संपन्न होणाऱ्या या स्वाध्याय शिबिरांना सुरुवातीला फक्त मदत करावी अशा भावनेने माझा सहभाग सुरू झाला. आणि या कार्याकरता श्रीमाँ व अरविंद यांनी जणू माझी निवडच केली असावी असे वाटावे अशी माझी वाटचाल सुरू झाली. म्हणतात ना The One who choses the divine is already chosen by divine हा प्रत्येक पावला पावलाला येत केला आणि शिबिरामध्ये केवळ दीक्षित काकांना मदत करता करता हे कार्य आता माझ्या आयुष्याचा अविभाज्य घटक बनले. घरातल्या सगळ्यांची भक्कम आणि अत्यंत मोलाची साथ मिळणं ही भाग्याची बाब परमेश्वराने सहज माझ्या पदरात टाकली. आणि एका अतिउच्च ईश्वरीकार्याच्या वाटेवरची मी एक वाटसरू झाले. दीक्षितकाकांवर असलेल्या महासरस्वतीच्या कृपेचा दृश्य परिणाम, अत्यंत नीटनेटच्या सुसंबंधी व उत्तम नियोजन ह्या आयोजनाच्या बाजूंचा अभ्यास करायला मिळाला, ही बाजू शिकायला मिळाली. हे कार्य करताना जाणवत जाते की परमेश्वराने माझ्याकडून या कार्याला आवश्यक असलेल्या सगळ्या बाबी माझ्या नकळत करून घेतल्या आणि स्वतःच्या आयुष्याचे जेव्हा सिंहावलोकन केले तेव्हा जाणवलं की ईश्वरी योजना माझ्या लहानपणापासून मला घडवत होती. जन्म बुलढाण्याचा आणि आई-वडिलांकडूनच अनेक गोष्टी वारसा म्हणून मिळाल्या. मुख्य म्हणजे अत्यंत दणकट आणि सुदृढ शरीर. आई-वडील आणि मोठी बहीण या तिघांनीही मला अत्यंत विचारपूर्वक वाढवलं. खेळ, चित्रकला, गायन, नृत्य, पाठांतर, वाचन या सगळ्या गोष्टी माझ्यामध्ये रुजवल्या. आयुष्याने नकळत वळण घेत घेत प्रवास केला. अगदी लहान वयात उत्तम पोहायला लागले. गावात तलावात पूर्ण फार दिवस शक्य झालं नाही म्हणून बॅडमिंटनला घातलं तर तिथेही प्रावीण्य मिळवणे शक्य झाले. अचानक खेळता खेळता लक्षात आलं की अभ्यासही बरा जमतोय, मग सगळं लक्ष अभ्यासाकडे वळवलं व बारावीनंतर कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर मध्ये हॉर्टिकल्चर या विषयात डिग्री घेतली. बॉटनीमध्ये एम एस स्सी करायला सुरुवात केली आणि जोडीदार गवसला. मग लग्न व संसार सुरू झाला. काही वर्षांनी हॉर्टिकल्चर मध्ये काम न करता कम्प्युटर्स शिकले व त्या क्षेत्रात नोकरी सुरू केली. अनेक स्थित्यंतरानंतर आणि प्रापंचिक परिपूर्णतेनंतर अध्यात्म्याची एक छोटीशी खिडकी मनात खुली झाली. आणि मसुरीला माझ्या गुरूंच्या चरणी मस्त टिकले आणि मग अवचितपणे ईश्वरी आशीर्वादाने स्वाध्याय शिबिरांच्या या कार्यात भगवंताने माझे निवड केली. तिथे मला प्राप्त झालेला असीम आनंद आता लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य माझ्याकडून करून तो करवून घेत आहे. आता या कार्याच्या

माध्यमातून जनश्रीला एका उच्च अध्यात्मिक वाटेकडे वळवणे व माँ व श्री अरविंद यांच्या कार्याविषयी अवगत करणे हे एकच ध्येय उराशी मी बाळगून आहे. अशांतीतून शांती शोधणाऱ्या सर्व जिज्ञासू साधकांना शांतीतून अजून शांती मिळवण्याच्या मार्गाबाबत अवगत करणे ही एकच आकांक्षा आता आयुष्यात आहे.

नैनिताल, रायवला व पाँडिचेरी येथे होणाऱ्या मराठी मधील स्वाध्याय शिबिरांचे आयोजन करणे व श्री अरविंद व श्री माताजींच्या असीम कार्याबद्दल लोकांना अवगत करणे हे कार्य गेले आठ वर्ष सातत्याने माझं सुरू आहे व शेवटच्या श्वासापर्यंत ते करता येवो ही श्रीमाँ अरविंद यांच्या चरणी प्रार्थना.

---

## प्रीती दामले

**– शोभा पारळकर**

मूळच्या नागपूरच्या व १९९१ नंतर पुण्यात कार्यरत असलेल्या प्रीती दामले ह्यांनी शीतल वैद्य ह्यांच्या समवेत, पुण्यात, 'आश्वस्त' ह्या संस्थेची स्थापना मे २०११ मध्ये केली. ज्येष्ठांच्या दैनंदिन जीवनात स्थैर्य, सहजता व आत्मनिर्भरता आणणे हा संस्थेच्या कामाचा उद्देश आहे. त्या दृष्टीने पुण्यात अनेक ज्येष्ठ व एकाकी व्यक्तींना लागेल तशी व लागेल तेव्हा मदत देणे सुरू केले व आता संस्थेचा विस्तार ३०० लाभार्थीपर्यंत पोहोचला आहे. संस्थेतर्फे प्रशिक्षित आणि भरवश्याचे 'आश्वस्त मित्र' आता घरोघरी ज्येष्ठांचे जीवन सुकर करण्याकरता झटत आहेत.

**शिक्षण व पूर्वानुभव :** बी. एस.सी, Post graduate Diploma in Hospital Management MBA (Finance), MBA (Marketing २००१ मध्ये पेशंट केअर युनिट – न्यूरोलॉजी संस्था पुणे येथे सुरू केले. २०२० मध्ये समवेदना संस्थेच्या CEO पदाचा राजीनामा दिला. व २०११ मध्ये 'आश्वस्त' संस्था सुरू केली. तेव्हा 'समवेदना' मधील १९ वर्षांचा अनुभव पाठीशी होता.

अनेक वैद्यकीय संस्थांमधे प्रत्यक्ष काम केले व अवयव प्रत्यारोपण, अवयवदान, नेत्रचिकित्सा व नेत्रदान. शालेय मुलांच्या वैद्यकीय समस्या इ. विषयांवर लेखांद्वारे व भाषणांद्वारे उद्बोधन केले.

वरील कामाची दखल घेऊन त्यांना पुण्याच्या रोटरी क्लबने दोनदा Vocational Exellence Award देऊन गौरविले. International Forum of Investors येथे, ऑगस्ट २०२२ मध्ये, न्यूजर्सी, U.S.A. येथे आश्वस्त संस्थेचे प्रतिनिधित्व केले. ८ मार्च २०२३ ला सर्वोत्तम उद्योजिका पुरस्कार देऊन रोटरी क्लब पुणे ह्यांनी गौरविले. नुकताच प्रीती दामले यांनी वार्धक्यशास्त्र (Gerentology वरील एक सर्टिफिकेट कोर्स A+ ग्रेड मिळवून पूर्ण केला आहे. त्यांना त्यांच्या पुढील वाटचाली करीता अनेक शुभेच्छा.

---

**शाखावृत्त –**

## मातृसेवा संघ आर्वी शाखेत आरोग्यविषयक जनजागृती

स्थानिक मातृसेवासंघ शाखेच्या वतीने आरोग्य विषयक जनजागृतीसाठी फिजिओथेरपिस्ट डॉ. पल्लवी खंडेलवाल यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष ॲड. अरुणा देशपांडे, मीना जाजू, सचिव ज्योती भट, मंजिरी करमरकर यांची उपस्थिती होती.

आधुनिक जीवनशैलीमुळे शारीरिक दुखणे कशी बळावत आहेत तसेच फिजिओथेरपीचे आजच्या दैनंदिन जीवनातील महत्त्व डॉ. पल्लवी खंडेलवाल यांनी समजावून सांगितले. व्यायाम करताना तो समजून उमजून करावा तसेच नेमकं दुखणं काय आहे याची तपासणी आपल्या डॉक्टरांकडून करून घ्यावी, असे त्यांनी सांगितले. छोट्या छोट्या व्यायामामुळे आरोग्यात होणारी सुधारणा आदींविषयी मार्गदर्शन केले. फिजिओथेरपीमुळे माणूस क्वॉलिटी लाईफ जगू शकतो. स्वावलंबी होऊ शकत असल्याचे समजावून सांगितले. यावेळी उपस्थितांनी शारीरिक दुखण्यासंबंधी विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी उत्तरे दिली व त्यांचे समाधान केले. यावेळी डॉ. पल्लवी खंडेलवाल यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक ॲड. अरुणा देशपांडे यांनी केले. संचालन कविता जोशी यांनी तर आभार ज्योती भट यांनी मानले. कार्यक्रमाला मातृसेवासंघ आर्वी शाखेच्या संचालक माया देशपांडे, देवयानी देशपांडे, योगिता पांडे, छाया बाजपेयी, आदी उपस्थित होते.

---

## स्नेहांगण मध्ये डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन

दि. २२/२/२४ गुरुवार रोजी मातृसेवासंघ, स्नेहांगण दिव्यांग मुलांच्या शाळेत डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ नागपूर व्हिजन यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षण, प्रशिक्षण आणि मनोरंजन तसेच दृक्श्राव्य माध्यमातून परिणामकारक शिक्षण होण्याच्या दृष्टिकोनातून डिजिटल क्लासरूमचे निर्माण करण्यात आले. या उद्घाटनप्रसंगी रोटरी क्लब ऑफ नागपूर व्हिजनचे अध्यक्ष श्री. अजय उपलांचीवर, श्रीमती जयश्री छाबरानी, श्री प्रमोद आचार्य, मातृसेवासंघाच्या सचिव डॉ. लता देशमुख, डॉ. पुष्पा भावे, शाळेतील मानसेवी शिक्षिका श्रीमती सुजाता संन्याल, श्रीमती वीणा मोहाडीकर, श्रीमती अलका ढोणे, श्रीमती भावना नंदनवार उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना रोटरी क्लब अध्यक्ष श्री. अजय उपलंचीवार यांनी आता विद्यार्थ्यांना सतत पुढे पुढे जायचं आहे मागे वळून बघायचे नाही असा संदेश दिला. तसेच श्रीमती जयश्री छाबरानी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासासारखी दुसरी दैवी शक्ती नाही आणि प्रत्येकाने स्वतःवर विश्वास ठेवून तसेच आपल्या जीवनात समतोल साधून कार्य करावे असा उपदेश केला.

---

# फार्म ४

**(नियम ८ पहा)**

१. प्रकाशनाचे स्थान व पत्ता : **मातृसेवा संघ,** सीताबर्डी, नागपूर-१२

२. प्रकाशन-अवधी : मासिक

३. मुद्रकाचे नाव व पत्ता : श्री एन्टरप्राईजेस, सीताबर्डी, नागपूर

आपण भारतीय नागरिक आहात काय? : होय

विदेशी असल्यास मूळ देशाचे नाव ----

४. प्रकाशकाचे नाव व पत्ता : **डॉ. लता देशमुख,** मातृसेवा संघ, सीताबर्डी, नागपूर-१०

५. संपादकाचे नाव व पत्ता : **शीला राव,** तळमजला, ३/ अमेय अपार्टमेंट, धरमपेठ, नागपूर-१०

आपण भारतीय नागरिक आहात काय? : होय

विदेशी असल्यास मूळ देशाचे नाव ----

६. नियतकालिकाचे मालक : **मातृसेवा संघ,** सीताबर्डी, नागपूर - १०

संपूर्ण भागभांडवलापैकी एक टक्क्याहून (जास्त भागभांडवलाचे हिस्सेदार). मी, डॉ. लता देशमुख याद्वारे असे घोषित करते की माझ्या अधिकतम माहिती आणि विश्वासानुसार वर दिलेले विवरण सत्य आहे.

नागपूर

**डॉ. लता देशमुख**
स्वाक्षरी

---



Regd. No. RNP/NP/ City/510/2023-2025

**मातृसेवा संघ, सीताबर्डी, नागपूर**

**प्रमुख कार्यालय : उत्तर अंबाझरी मार्ग, सीताबर्डी, नागपूर - १०**
**दूरध्वनी ०७१२-२५२२२८७, ०७१२-२५२२३९३ / २५२३५९६**

**कार्यक्षेत्र**

**- शाखा -**

**१. सीताबर्डी, नागपूर २. महाल, नागपूर ३. वर्धा ४. भंडारा ५. आर्वी ६. जबलपूर ७. हिंगणघाट ८. ब्रह्मपुरी ९. बिलासपूर १०. वरोरा ११. चांदूररेल्वे १२. अकोला**

**- सीताबर्डी सूतिकागृहांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सुविधा -**

**बाह्यरुग्ण विभाग, शस्त्रक्रिया विभाग, बालरोग विभाग, अपूर्णकाल अर्भक विभाग, बृद्ध व स्त्रीरुग्णसेवा, कुटुंब कल्याण योजना, प्रसवपूर्व तपासणी, प्रसवोत्तर तपासणी, बालविकास चिकित्सा केन्द्र, पॅथॉलॉजी, सोनोग्राफी व कलर डॉपलर, पॅपस्मिअर टेस्ट (कॅन्सर निदान केन्द्र), कॉल्पोस्कोपी, एड्स, (आय.सी.टी.सी.टी.) प्रकल्प, मेमोग्राफी, संध्यादीप**

**शैक्षणिक कार्यक्रम**

**बहुउद्देशीय परिचारिका प्रशिक्षण केंद्र, सी.जी.ओ., डी.जी.ओ. -**

**नागपुरातील प्रकल्प / प्रवृत्ती -**

*** महिला व बाल कल्याण सीताबर्डी रुग्णालय आणि अनुसंधान संस्था, सीताबर्डी नागपूर ⁕ सुधारित सहाय्यक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्र ⁕ कर्मचारी महिला वसतीगृह, सीताबर्डी, नागपूर ⁕ इन्स्टिटयूट ऑफ सोशलवर्क, बजाजनगर ⁕ नंदनवन दुर्बलमनस्क मुलांची शाळा व संरक्षित कर्मशाळा, सीताबर्डी, नागपूर ⁕ पंचवटी आश्रम ⁕ मातृसेवा मासिक ⁕ कर्मचारी महिला वसतीगृह, बजाजनगर ⁕ 'स्नेहांगण' अपंग मुलांची शाळा ⁕ कौटुंबिक सेवा सल्ला केंद्र, बजाजनगर व मासेस समाजकार्य संस्था बजाजनगर ⁕ विकलांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्प ⁕ कुसुम विहार ⁕ मेमोग्राफी सेंटर**

---

Regd. with the Registrar of Newspapers, New Delhi 11638/1966
**प्रकाशक :** अध्यक्ष/सचिव, मातृसेवा संघ, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर - १०
**अक्षर जुळवणी व मुद्रक :** श्री एन्टरप्राईजेस, सीताबर्डी, नागपूर - ४४००१२